

इंदिरावादी कॉंग्रेस
पक्षालाच निवडून
दिले पाहिजे...

वि. शं. पारगावकर

माझा
जाहीरनामा

# माणूस

माणूस

राजकारणी लोकांचे
तळहात तपासण्याची
वेळ आली आहे...

दि. बा. मोकाशी



माणूस




उच्चार आणि आचार
यातील सुसंगती...

वि. स. वाळिंबे

बुधवार
६ जानेवारी १९७१
चाळीस पैसे

बुधवार, ६ जानेवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : ~~[illegible]~~ दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : पन्नासावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

◻ 'माणूसच्या'च्या १९ डिसेंबरच्या अंकातील श्री. रमेश मंत्री यांचे पत्र वाचले. श्री. मंत्री यांच्या पत्रातील मजकूरावरून ते विनोदाचा नवा प्रकार रूढ करू पहात आहेतसे वाटते.

आता मंत्री यांनी केलेल्या विधानांविषयी–

१. श्री. यशवंतरावांचा क्रम लावतेवेळी आचार्य विनोबा भावे, श्री. सी. डी. देशमुख इत्यादीकांचे स्मरण झाले असते तरी चालले असते.

२. मी योजलेल्या वाक्यांच्या संदर्भात, 'कौतुकाचे गालबोट' ह्याचा अर्थ न कळण्याएवढे श्री. मंत्री खरोखरच असमंजस आहेत काय ?

३. श्री. बाळ सामंत ह्यानी जी कोटी केली ती कोटीही श्री. मंत्री ह्यांनी ध्यानात घेतलेली दिसत नाही. श्री. सामंतांच्या त्या वाक्याला उद्देशून मी लिहिले, 'हे ऐकल्यावर बाकीच्या तिघा विनोदी लेखकांनी आपापल्या घरी फोन घ्यायचे ठरवून टाकले. संपादिकेचा फोन बापडा येवो वा न येवो पण तो येतो म्हणून शेखी तर मारता येईल !' ह्या वाक्यातला प्रतिटोला श्री. मंत्री यांनी ध्यानात घेणे जरूर होते.

४. किर्लोस्करमध्ये श्री. मंत्री यांची 'अखेरची शिकार' कथा आली त्यावेळी आमचे बोलणे झाले ते असे–

'ह्या वेळी किर्लोस्करला तुम्ही गंभीर कथा दिली आहे.'

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

'अहो पण वर्तमानपत्रात; किर्लोस्करमधली श्री. रमेश मंत्री यांची 'विनोदी कथा' फार छान आहे, असा अभिप्राय आला आहे.'

म्हणजे अभिप्रायसुद्धा असा येतो ! ह्या बोलण्याला अनुलक्षून मीं ते वाक्य लिहिले होते. हे बोलणे श्री. मंत्री यांना आठवते काय ?

५. खटल्याचा कार्यक्रम शेवटपर्यंत न पहाता मी शेवटी शेवटी उठून आले ह्यातच कार्यक्रमाविषयीची माझी प्रतिक्रिया लक्षात यावी. फिर्यादी पक्षातील सर्वजणी तरी कार्यक्रमाला शेवटपर्यंत बसल्या होत्या काय ?

६. साहित्यसंघात होणार असलेला, 'विनोदी लेखकांवर स्त्रियांची फिर्याद' हा हा कार्यक्रम, वर्तमानपत्रात 'आजचे कार्यक्रम' ह्या सदराखाली प्रसिद्ध झालेला होता. 'आमंत्रितांसाठी' असा वर्तमानपत्रात उल्लेख नव्हता. साहित्यसंघात तळ-मजल्यावरच, पुरंदरे सभागृहात होणारा हा कार्यक्रम 'आमंत्रितांसाठी' आहे असे मला समजले व मी तिथूनच परतले. त्यामुळे 'सौ. मंदाकिनीबाई आमंत्रण नसताना आल्या होत्या आणि जागा न मिळाल्याने त्यांना परत जावे लागले होते' वगैरे मजकूर निरर्थक आहे.

७. माणूसमध्ये साहित्यसंमेलनावर मी लिहिणार आहे हे समजताच (दुसऱ्याकडून माझा फोन नंबर विचारून घेऊन) श्री. मंत्री ह्यांनी मला फोन केला होता व विचारले होते, 'फिर्यादी म्हणून तुम्ही खटल्यात भाग घेणार काय ?' श्री. मंत्री ह्यांच्या ह्या विचारण्यामागील हेतू लक्षात येऊन मी ताबडतोब नकार दिला होता. ह्या साऱ्या पार्श्वभूमीवर मळमळ कोणाची दिसते आहे ? ह्या विषयात माझ्या-पुरते तरी हे अखेरचे.

२४ डिसेंबर १९७० — सौ. मंदाकिनी गोगटे, मुंबई

□ आपण आपल्या १९ डिसेंबरच्या अंकात श्री. रमेश मंत्री ह्यांचे 'अहवाल की मळमळ ?' या शीर्षकाचे पत्र प्रसिद्ध केले आहे. सदर पत्रात 'बागेश्री' वार्षिका-संबंधी जे लिखाण श्री. मंत्रीनी केले आहे ते अप्रस्तुत असल्यामुळे प्रकाशक या नात्याने खुलासा करण्यासाठी हे पत्र.

'बागेश्री' वार्षिकाच्या संपादिका, सौ. मंदाकिनी गोगटे, ह्यांना आपल्याकडून वैयक्तिकरित्या खारच्या संमेलनासंबंधी टीकात्मक वृतांत देण्यासाठी निमंत्रणपत्र आले होते. 'बागेश्री' संपादिका म्हणून नव्हे हे सर्व प्रथम नमूद करणे इष्ट आहे. 'बागेश्री' वार्षिक गेली ६ वर्षे सतत प्रसिद्ध होत आहे. उच्च अभिरूचीची पातळी न सोडता सर्वांचे मनोरंजन व्हावे या उद्देशाने मराठीतील नामवंत लेखक, लेखिकांचे —कथा, विनोद, ललित, विविध-साहित्य वार्षिकात प्रसिद्ध होत आले आहे व होणारही आहे. 'बागेश्री'च्या सुरवातीच्या काळात श्री. रमेश मंत्री यांनीही लिहिले आहेच. त्यांनी जुनीच आकडेवारी प्रसिद्ध करून 'बागेश्री'वरील आपली मळमळ सर्वतोपरी व्यक्त केली आहे असे दिसते. — क. ना. गोगटे, मुंबई

**या विषयावरील पत्रव्यवहार आता बंद केला आहे.—सं.**

# माझा जाहिरनामा

## वि. शं. पारगावकर

१९६९ साली डिसेंबरमध्ये मी ' माणूस 'तर्फे अहमदाबाद येथे संघटना कॉंग्रेसच्या अधिवेशनाला गेलो होतो. तेथील पाहणीच्या निमित्ताने आणि अनुशंगाने जानेवारी महिन्यातच–म्हणजे बरोबर एक वर्षापूर्वी–' माणूस 'मध्ये मी पाच लेखांक लिहिले होते. त्यावेळी संघटना कॉंग्रेस या पक्षाविषयी मी जी विधाने केली होती ती आज एक वर्षाने खरी ठरली आहेत. आपण त्यावेळी केलेले विश्लेषण आणि तो एक राजकीय पक्ष म्हणून वर्तविलेले भविष्य बरोबर ठरले याबद्दल विशेष प्रौढी मिरविण्याचे कारण नाही. तरीपण मनाला त्या विषयी समाधान वाटते. ते अशासाठी की मी कोणी राजकारणाचा अभ्यासक नाही किंवा एखाद्या राजकीय पक्षाचा सभासद नाही. या देशाचा एक सामान्य नागरिक म्हणून या देशातील घडामोडींकडे आपुलकीने, खोल आणि गंभीरपणे पाहण्याची मला आवड आहे. हिला मी सामान्य नागरिकाची आवड म्हणतो.

या देशातील बहुसंख्य नागरिकांमध्ये अशी आवड आणि वृत्ती निर्माण झाली पाहिजे असे मला वाटते. कारण आपल्या देशाने लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. लोकशाही देशामध्ये तेथील नागरिकाला जसे विचार स्वातंत्र्य असते तसेच विचार करून वागण्याची जबाबदारीही असते. अर्थात या जबाबदारीची आपल्या देशातील बहुसंख्य नागरिकांना जाणीवच नसते. याचे प्रत्यंतर आपणास निवडणुकीच्या वेळी येते. निवडणुकांमध्ये या देशातील बहुसंख्य नागरिक आंधळ्या वृत्तीने मतदान करतात आणि चुकीची माणसे, नको ती माणसे कारभारावर निवडून देतात.

गेल्या वीस वर्षांत आपल्या देशात चार निवडणुका झाल्या. आणि आता लोकसभेची पाचवी निवडणूक येत्या फेब्रुवारी महिन्यात होणार आहे. त्या निवडणुकीत या देशातील एकवीस वर्षांवरील सर्व नागरिकांना मतदान करावयाचे आहे. आणि आपल्याला कोणत्या प्रकारचे राज्यकर्ते हवे आहेत याचा नीट खोलवर विचार करून त्यांनाच निवडून द्यावयाचे आहे.

या निवडणुकीविषयी आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या मतदानाविषयी आज माझ्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मी स्वत: तर स्वत:विषयी विचार करतो आहेच. पण त्याबरोबरच ज्या नागरिकांमध्ये मी राहात आहे त्या नागरिकांविषयी आणि जे या देशाचा कारभार करू इच्छिणारे उमेदवार आहेत त्यांचेविषयीही माझ्या मनात प्रश्न निर्माण झाले आहेत. निरनिराळ्या पक्षांचे राजकारण मी वीस-बावीस वर्षे पाहात आलो आहे. ही झाली स्वातंत्र्योत्तर काळातील वर्षे. पण त्याही पूर्वीपासून मी स्वातंत्र्याच्या राजकारणाकडेही काळजीपूर्वक पाहात आलो आहे.

अर्थात स्वातंत्र्यापूर्वीही या देशात स्वातंत्र्याचे राजकारण करणारा जो बलाढ्य पक्ष होता तो काँग्रेस पक्षच होता. आणि स्वातंत्र्योत्तर काळात देखील आजपर्यंत जो बलशाली पक्ष म्हणून ओळखला जातो तोही काँग्रेस पक्षच आहे. याच पक्षाच्या उमेदवारांना मी आजवर मते देत आलो आहे.

गेल्या वर्षी हा पक्ष फुटला. वास्तविक तो गेल्याच वर्षी फुटला आहे असे नाही. वर्षानुवर्षे या पक्षातून लोक बाहेर पडतच आले आहेत. इतकेच नव्हे तर कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष डांगे हे देखील एके काळी काँग्रेसमध्येच होते ! मग लोहिया, एस्. एम्., गोरे वगैरे मंडळी असतील त्यात नवल काय ? या पक्षातील विचारसरणी पुढे ज्यांना ज्यांना पटली नाही असे लोक काँग्रेसबाहेर पडले आणि त्यांनी आपापले नवे पक्ष या देशात स्थापन केले. ही जशी एक गोष्ट खरी आहे तशीच दुसरीही तितकीच खरी आहे. ती म्हणजे जसे आतले लोक बाहेर पडत गेले तसेच बाहेरचे लोकही या पक्षाकडे आकर्षित होत गेलेले आहेत.

आणि या घडामोडीत प्रामुख्याने एक गोष्ट अशी दिसते की या पक्षातून बाहेर पडलेल्या मंडळींनी जी जी निराळी बिऱ्हाडे मांडली ती मोडकळीला आलेली आहेत. त्यातील काही तर मोडून नेस्तनाबूत झालेली आहेत. उदाहरणार्थ पूर्वी काँग्रेसमधून फुटलेल्या काही लोकांनी ‘ हिंदु महासभा ’ नावाचा एक पक्ष स्थापन केला. अर्थात या पक्षाची आता काय अवस्था आहे हे सर्वज्ञातच आहे. तीच गत आज प्रजासमाजवादी पक्षाचीही होऊ घातलेली आहे ! त्याला लागलेला घरडा मला स्पष्ट ऐकू येत आहे. संयुक्त समाजवादी पक्षाचीही तीच रडकथा आहे. या पक्षाला अजून काही केल्या जनमानसावर आपला प्रभाव पाडता आलेला नाही. तीच गत संघटना काँग्रेस नावाच्या पक्षाची होणार आहे. केरळच्या निवडणुकीत जे घडले तेच आता या निवडणुकीत या पक्षाचे घडले तर मला नवल वाटणार नाही.

देशाच्या आजच्या राजकारणाच्या आणि लोकशाहीच्या मूलभूत सिद्धांताच्या जे लोक आणि त्यांचे पक्ष जवळचे होते त्यांचेविषयी आणि त्यांच्या आजच्या भवितव्याविषयी मी वर लिहिले. ज्यांचा लोकशाहीशी संबंधच नाही अशा किती

तरी पक्षाविषयी येथ बोलता येईल. पण त्याचा विचारही करण्याची गरज नाही. उदा. मुस्लिम लीग, जनसंघ आणि कम्युनिस्ट पक्ष. या पक्षांचा लोकशाहीशी आणि व्यक्तिस्वातंत्र्य प्रधान लोकजीवनाशी सुतराम संबंध नाही. देशातील अधिकारावर असलेला मोठा राजकीय पक्ष लोकशाही प्रधान असल्यामुळे या बाकीच्या पक्षांना वेळ पडेल तसे लोकशाही पवित्रे घ्यावे लागतात. अर्थात् त्यांचे हे पवित्रे संधिसाधू वृत्तीचे आणि ढोंगीपणाचे असतात हे निराळे सांगावयास नकोच. पण त्याहीपेक्षा, असे करीत असताना ते स्वतःच्या पक्षाशीही अप्रामाणिक होतात आणि जनतेची दिशाभूल करीत असतात ही त्यातल्या त्यात वाईट गोष्ट आहे.

अप्रामाणिकपणा आणि जनतेची दिशाभूल याचा उत्तम नमुना म्हणजे संघटना काँग्रेस आहे. आश्चर्य म्हणजे एकमेकांपासून फुटून निघण्यापूर्वी या पक्षातील लोक 'समाजवादाचा' घोष करीतच होते. शिवाय समाजवादी कार्यक्रमाची अंमल-बजावणी अधिक परिणामकारकपणे करता यावी म्हणून काँग्रेसमधले लोक फुटून निघाले. आणि फुटून निघाल्यानंतर काही दिवस तर यांनी 'समाजवादा'चा जय-घोषच सुरू केला होता. त्यात संघटना काँग्रेसच्या लोकांच्या समाजवादाची परिणती 'जनसंघ' आणि 'स्वतंत्र' या प्रतिगामी पक्षांबरोबर बडी आघाडी उघडण्याचा प्रयत्न करण्यात झाली. हे केवढे वैभवशाली अपयश आहे बरे!

इंदिरा काँग्रेसच्या नावाने जरी इतर पक्ष आणि स्वतः संघटना काँग्रेस बोटे मोडीत असले तरी त्यामध्ये व्यक्तिद्वेषापलीकडे त्यांच्या टीकेला काही अर्थ नाही. इंदिराबाई पंतप्रधान झाल्यापासून त्यांनी जे राष्ट्रीय निर्णय घेतले आहेत ते निश्चितच ठाम आणि पुरोगामी आहेत. नेहरू गेल्यापासून देशातले प्रश्न आणि कटकटी अधिक वाढल्या. १९६५ साली पाकिस्तानला उघड उघड भारतावर आक्रमण करण्याचे धैर्य झाले. कै. लालबहादूर शास्त्री यांनी त्या आक्रमणाला धैर्यानेच तोंड दिले. परंतु त्यांनी युद्ध जिंकले असले तरी तह हरला. त्यामुळे दोन गोष्टी झाल्या. एक, देशात फूट पडली आणि दुसरी महागाई भयंकर वाढली. लालबहादूर निघून गेले आणि पंतप्रधान म्हणून या दोन गोष्टींना इंदिराबाईंना तोंड द्यावे लागले आणि अजूनही द्यावे लागत आहे.

त्यातच १९६२ साली चिनी आक्रमण आणि १९६५ च्या पाकिस्तानी आक्र-मणामुळे देश हळूहळू भांडवलदार आणि व्यापारी लोकांच्या हातात जात राहिला. याचा परिणाम देशातील बहुसंख्य गरीब जनतेवर होऊ लागला. मालाची टंचाई निर्माण करणे आणि सरकारच्या व गरीब जनतेच्या नाड्या आवळून आपल्या हातात ठेवणे हे जणू भांडवलदार वर्गाचे अस्त्रच होऊन बसले!

एकीकडे ही गळचेपी आणि दुसरीकडे खुद्द काँग्रेसमध्येच असलेला वयोवृद्ध प्रति-गामी विचारसरणीच्या लोकांचा जाच. अशा विचित्र कात्रीत इंदिराबाईंचे नेतृत्व सापडले. स. का. पाटील, मोरारजीभाई आणि निजलिंगप्पासारखे प्रतिगामी परंतु

महत्त्वाकांक्षी लोक इंदिराजींच्या पंतप्रधानपदावर नाखूष होते. त्यामुळे कॉंग्रेस-मध्येच राजकारण आणि सत्ता यात अंतर्विरोध निर्माण झाला आणि त्याचीच परिणती कॉंग्रेस पक्ष दुभंगण्यात झाली. इंदिराबाईंचे पंतप्रधानपद तर सोडाच पण वैय्यक्तिक कॉंग्रेस सभासदत्वही रद्द करण्यापर्यंत निजलिंगअप्पांची मजल गेली !

अर्थात त्यामुळे काहीही झाले नाही. उलट ज्यावर डोकं आपटलं ती वस्तू न फुटता डोकंच फुटलं. याचे कारण कॉंग्रेस पक्षातील बहुसंख्य सभासदांचा इंदिराजींच्या व्यक्तिमत्वावर विश्वास होता हेच आहे. आपल्या कारकीर्दीच्या थोड्याशाच काळात त्यांनी बरेच गुंतागुंतीचे आणि नाजूक प्रश्न सोडविले आहेत. पंजाब, हरियाणा आणि चंदीगडचा प्रश्न, गोव्याचा प्रश्न, नव्या मेघालय राज्याचा प्रश्न त्यांनी तडकाफडकी सोडविले आणि आता बेळगावचा प्रश्नही त्यांनी त्यांच्या पद्धतीने धसास लावला आहे. माझी खात्री आहे की इंदिरा कॉंग्रेस पुन्हा सत्तेवर आली तर हा प्रश्न अगदी लवकर सुटेल. तसेच बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि संस्थानिकांचे तनखे आणि खास अधिकार याही धाडसाच्या गोष्टींमध्ये त्यांनी हात घातला आहे. आपणाला असा विचार करता येईल की पंडित नेहरूंच्या हातात जेवढी सत्ता आणि त्यांची वैय्यक्तिक लोकप्रियता होती तेवढी भारताच्या कोणत्याच पंतप्रधानाच्या हाती नाही. परंतु नेहरूंनादेखील हे प्रश्न सोडविता आले नाहीत. साधा राष्ट्रभाषेचा प्रश्न तोही त्यांनी सोडविला तर नाहीच, उलट अधिक क्लिष्ट करून ठेवला. मग इतर प्रश्नांचे काय ?

या देशातील लाखो लोकांनी स्वातंत्र्यासाठी प्राण वेचले आहेत आणि त्याग केलेला आहे. असे प्राण वेचणे आणि त्याग कोणत्या संस्थानिकाने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी केलेला आहे ? मी एका संस्थानचा पूर्वी नागरिक होतो. त्या संस्थानिकाचा त्याग तर सोडाच परंतु तिथे मूळ धरू पाहणारी स्वातंत्र्याची चळवळ यांनी दंडुकेशाहीने मोडून काढण्यात धन्यता मानली आहे ! असे हे संस्थानिक. आणि आता स्वातंत्र्याच्या काळात, त्याग केलेल्या आणि गरीबीत दिवस कंठणाऱ्या भारतीय जनतेने भरीत असलेल्या करातून या संस्थानिकांना लठ्ठ लठ्ठ तनखे काय म्हणून देण्यात यावेत ? इंदिराजींनी देशाच्या या भावना लक्षात घेऊन संस्थानिकांच्या या प्रश्नाला धाडसाने हात घातला. याबाबतीत लोकसभेचा कल तर त्यांच्या बाजूचा आहेच आणि राज्यसभेचा असल्यासारखाच आहे. इतक्या क्षुल्लक अल्पमतावरून त्याला गालबोट लागलेले आहे.

परंतु व्यक्तिद्वेषाने जळणाऱ्या संधिसाधू लोकांनी त्या क्षुल्लक अल्पमताचे केवढे भांडवल करावे ? तसेच बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे आहे. ' राष्ट्रीयीकरण फसले ! राष्ट्रीयीकरण फसले; बँका बुडाल्या ' अशी केविलवाणी हाकाटी विरोधी पक्षातील लोकांनी सुरू केली. ती केवळ अर्थशून्य आहे.

पृष्ठ ४९ वर



अरुण गोसावी

# त्यांनी आधी बोलायला हवे होते... ....

महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि माजी व आजी लाडके नेते श्री. बाळासाहेब देसाई आजकाल बऱ्याच ठिकाणी भाषणे करतात आणि खूप बोलतात. त्यावरून त्यांची लोकप्रियता तर दिसून येतेच पण त्याचबरोबर लोकांच्या समस्यांबाबतची त्यांची पोटतिडीकही कळते. त्यांची भाषणे ऐकणाऱ्यांना वाईट याचेच वाटते की, मंत्रीपदावर असताना बाळासाहेब अशी भाषणे का करीत नसत? अशी भाषणे म्हणजे भीमदेवी थाटाची भाषणे नव्हे तर ज्या कल्पना किंवा विचार ते आजकाल बोलून दाखवितात ते विचार पूर्वी आपल्याजवळच का ठेवीत? मंत्री असताना त्यांना अशा दैदीप्यमान कल्पना स्फुरत नव्हत्या काय? त्यावेळी त्यांना हे विचार सुचले असते तर काही तरी साधले असते.

उदाहरणार्थ, परवा मुंबईत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी समारंभात बाळासाहेबांनी केलेले भाषण. म्हणजे त्यांनी या भाषणात नवीन विचार मांडला असे नव्हे. पण बाळासाहेबांनी स्वत: जे सांगितले हे महत्त्वाचे आहे....

बाळासाहेबांनी चक्क मागणी केली की, १९७१ च्या होणाऱ्या खानेसुमारीत नागरिकांच्या जातीजमातींची नोंद न करता फक्त त्यांच्या आर्थिक स्थितीचीच नोंद करावी आणि ज्या काही सवलती द्यायच्या त्या जातीवर आधारीत असता कामा नयेत. नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीवर या सवलती अवलंबून ठेवाव्यात.

श्री. देसाई म्हणाले, स्वातंत्र्य मिळून तेवीस वर्षे उलटून गेली तरी आपण माणसाच्या जन्मावरून जात ठरवतो. एखादी सबंध जातच्या जात पुढारलेली किंवा मागासलेली ठरविली जाते. याचाच अर्थ जन्माने जो बॅकवर्ड तो बॅकवर्ड हे तत्त्व आम्ही अजून सोडलेले नाही. हे बदलले पाहिजे. कर्तृत्व ठरवायचे आहे ते जन्मावर किंवा जातीवर न ठरविता विद्वत्ता आणि बहुश्रुतता यावरून ठरविले पाहिजे. ज्योतिबांच्या क्रांतीचा झेंडा खांद्यावर घेऊन तरुणांनी या जातीय विषमतेविरुद्ध लढले पाहिजे. जातीयतेविरुद्ध लढले पाहिजे. खऱ्या जाती दोनच. सधन आणि निर्धन.

अनेकजण बाळासाहेबांच्या या विचारांचे स्वागतच करतील. किंबहुना शैक्षणिक व इतर सोयीसवलती जातींवर अवलंबून न ठेवता आर्थिक स्थितीवर ठेवाव्यात

अशी आधीच अनेक पक्षांची मागणी आहे. जातींवर आधारीत असलेल्या सोयी सवलतींचा किती सर्रास दुरुपयोग होतो आणि पुढारलेल्या समजल्या गेलेल्या जातीतील माणूस कितीही दरिद्री असला तरी त्याची कशी कुचंबणा होते हे सर्वांना माहीत आहे. मंत्रिमंडळात असताना ही कल्पना बाळासाहेबांनी मांडली असती तर त्यांची प्रतिमा कितीतरी वाढली असती. त्यांना राजकीय कारणांसाठी विरोध झाला असताच, कारण या सोयी-सवलतींवर काँग्रेसची कितीतरी मते अवलंबून आहेत. परंतु एक पुरोगामी नेता म्हणून त्यांचे वजन वाढले असते. आणि अशा-सारख्या एखाद्या प्रश्नावर त्यांनी राजीनामा दिला असता तर मग विचारायलाच नको होते.

बाळासाहेबांच्या निकटवर्तीयांकडून समजते की, खुद्द त्यांनाही या गोष्टीची खंत आहे. राजीनामा देताना एखाद्या मोठ्या विषयाचा इशू करून राजीनामा द्यावयास हवा होता. वैयक्तिक मानापमानाचे कारण सांगून राजीनामा दिला हे चांगले झाले नाही असे राहून राहून बाळासाहेबांना वाटते आहे. त्यांच्या खाजगी बोलण्यातूनही ते दिसते.

या चुकीवर पांघरुण घालण्याचा व्यर्थ प्रयत्न श्री. देसाई अधूनमधून करतात. मागे एका भाषणात त्यांनी सांगितले की, मंत्रिमंडळात राहून गरीबांचे प्रश्न सोडविता येत नाहीत म्हणून मी राजीनामा दिला. खरोखरच जर तसे असते तर त्यांनी अगोदर का सांगितले नव्हते ?

मंत्रीपदावर असताना जातीभेदांवर बाळासाहेब अगदीच बोलत नसत असे नाही. पण एवढे सडेतोड विचार आणि इतकी स्पष्ट मागणी त्यांनी केली नव्हती. ते शिक्षणमंत्री असताना महाराष्ट्रात आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना शैक्षणिक सवलती मिळाल्या हे खरे आहे. पण ती मूळ कल्पना त्यांची हे खरे नाही. तो तर एका राष्ट्रीय धोरणाचा भाग आहे.

असो. तर हे सगळे सांगण्यामध्ये बाळासाहेबांवर हेतूशून्य टीका करून कंडू शमविण्याचा उद्देश नाही. मंत्र्यांच्या प्रामाणिक मतांचा हा प्रश्न आहे. प्रत्येक मंत्री रिटायर झाल्यानंतर माझी अमुक मते होती, तमुक मते होती असे सांगून पुरोगामीत्वाचा आव आणू लागला तर त्यात काय हशील ? सत्तेवर असताना मंत्र्याने केवळ खुर्चीसाठी आपली प्रामाणिक मते दडपून ठेवायची ? सत्तेवर असतानाच आपले विचार आणि कल्पना अमलात आणण्यासाठी मंत्र्याने आपली ताकद वापरायला नको काय ? बाळासाहेब तर किती वजनदार मंत्री होते. मंत्रिमंडळाची शिस्त असते हे कबूल. पण आपले वैयक्तिक विचार तरी मंत्रिमंडळाच्या सदस्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला काय ? बाळासाहेब जो जो भाषणे करतात तो तो अधिकाधिक वाईट वाटू लागते ते याचे की, त्यांनी हे आधी बोलायला हवे होते.

म्हणजे कितीतरी लोक त्यांच्या बाजूला उभे राहिले असते. त्यांच्याविषयीचे गैरसमज पसरले नसते.

एक गैरसमज असा की बाळासाहेब मोठे जात्याभिमानी. वर दिल्याप्रमाणे मागणी त्यांनी केली असती आणि त्या प्रश्नावर राजीनामा दिला असता तर हा गैरसमज राहिला असता काय ? असे अनेक गैरसमज आहेत. आणखी एक वदंता अशी की आपल्याकडचे महसूल खाते काढून कुठले तरी खालचे खाते आपणाला देणार या केवळ ऐकीव माहितीवर संतापून त्यांनी राजीनामा दिला. बाळासाहेब जर प्रथमपासून आपली स्पष्ट मते मांडीत गेले असते तर या गैरसमजांना जागा राहिली नसती.

श्री. देसाई यांनी राजीनामा देऊन बरेच दिवस झाले आहेत. ती आता शिळी गोष्ट झाली. पुन: पुन: तें प्रकरण उकरून काढण्याचे कारण एवढेच की, बाळासाहेब मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे सदस्य होते. एकेकाळी मुख्यमंत्रीपदाची त्यांना आकांक्षा होती. सभागृहाचे उपनेते होते. जनमानसात त्यांची खरी-खोटी पण निश्चित प्रतिमा होती. म्हणून त्यांच्या बाबतीत हे असे घडायला नको होते असे वाटते.

जातीभेदाच्या प्रश्नावरच मुंबईमध्ये जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात एक परिषद भरते आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे मुंबईत नुकतेच पुनरूज्जीवन करण्यात आले. त्यानिमित्त नुकताच एक मेळावा भरविण्यात आला होता आणि त्या मेळाव्यात सत्यशोधक समाज परिषद घेण्याचे ठरविण्यात आले. समाजाचे ध्येय आहे ज्योतिबा फुले यांच्या विचारसरणीप्रमाणे सामाजिक व वैचारिक क्रांती घडवून आणणे. समाजाचे अध्यक्ष म्हणून श्री. रामराव आदिक यांची निवड झाली आहे. समाजाच्या आगामी परिषदेला श्री. बाळासाहेब देसाई प्रमुख पाहुणे म्हणून हजर राहतील. समाजाच्या प्रचार शाखा सर्व महाराष्ट्रभर काढण्याचे ठरविण्यात आले.

सत्यशोधक समाजाच्या या पुनरूज्जीवनाची अजून तरी कुणी फारशी दखल घेतलेली दिसत नाही. जुन्या समाजावर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद भडकविण्याचा आरोप होता. पुनरूज्जीवीत समाज जुन्या सत्यशोधक समाजाचे सर्व वारसे घेऊन पुढे जातो की काही नवीन मिळविण्याचा प्रयत्न करतो ते आता लवकरच दिसेल. समाजाच्या येत्या मेळाव्यात समाजाच्या बऱ्याचशा कल्पना स्पष्ट होतील.

याच संदर्भात गेल्या आठवड्यात अवघ्या दोन-तीन दिवसाच्या अवधीत मुंबईच्या वृत्तपत्रांच्या दैनंदिनीमध्ये प्रसिद्ध होत असलेल्या कार्यक्रमांची यादी नजरेखालून घालण्यासारखी आहे. ब्राह्मण संघ, तिल्लोरी कुणबी समाज, भंडारी समाज, त्वष्टा कासार समाज, देवज्ञ समाज, गोमांतक मराठा समाज, पाठारे प्रभु ट्रस्ट, चा. का. प्रभू मंडळ आदी संस्थांचे काही कार्यक्रम होते. केवळ दोन-तीन दिवसातले हे कार्यक्रम. आठवडाभराची वृत्तपत्रं चाळली तर ही यादी आणखी कितीतरी लांब होऊ शकेल. सहज नजरेला आले म्हणून हा उल्लेख केला एवढेच.

# जुळी मुंबई

जुळी मुंबई योजनेचा जन्म झाल्यापासून या कल्पनेला जोराचा विरोध होत आहे. सुरुवातीला हा विरोध शे. का. पक्षापुरताच मर्यादित होता. नंतर कम्युनिस्ट, सं. सो. पा. त्यांची बाजू उचलून धरू लागले. आता इंडिकेट काँग्रेसचीही काही मंडळी या विरोधात सामील झाली आहे. गेल्या आठवड्यात तर प्रति-मुंबई विरोधी एक परिषदच घेण्यात आली होती. सं. सो. पा. ने प्रति-मुंबईला विरोध करण्यासाठी प्रखर आंदोलन करण्याचे ठरविले आहे. या आंदोलनाचे पहिले पाऊल म्हणून सुमारे दोन महिन्यापूर्वी जॉर्ज फर्नांडिस आणि त्यांच्या काही अनुयायांनी एक लाक्षणिक जमीन बळकाव सत्याग्रह केला होता. नरीमन पॉईंटवर नव्याने बांधल्या जात असलेल्या शिपिंग कॉर्पोरेशनच्या अनेक मजली इमारतीच्या एका मजल्यावर या सत्याग्रहींनी ठाण मांडले होते. आता शिपिंग कॉर्पोरेशनच्या इमारतीचा जुळ्या मुंबईशी काय संबंध आहे कुणास ठाऊक. पण जॉर्ज साहेबांची भलतीच पंचाईत झाली होती. कारण रात्री बारा वाजता सत्याग्रहींनी जागेचा ताबा घेतला आणि दुसरे दिवशीचे बारा वाजून गेले तरी अटक होण्याचे चिन्ह नाही. अन्न-पाणी आणि इतर विधी याशिवाय सारे सत्याग्रही तिष्ठत पडले. अखेर दुपारी एक वाजण्याच्या सुमारास त्यांना अटक करून पोलिसांनी त्यांचे हाल थांबविले.

प्रति-मुंबईच्या विरोधकांचा मुख्य मुद्दा हा की या योजनेमुळे मुंबईच्या सर्व समस्या अधिकच उग्र होतील. मुख्य म्हणजे या टापूची लोकसंख्या दुपटीने वाढेल हे धोक्याचे आहे. या योजनेमुळे कुणाचा फायदा होत असेल तर तो भांडवलदारांचा. कारण त्यांनाच आपले कारखाने आणि व्यापार मुंबईच्या अवती-भवती हवा आहे. शिवाय कोटी-सव्वाकोटी लोकसंख्येचे हे महानगर अगदी समुद्र किनाऱ्यावर असणे हे संरक्षण दृष्ट्या अतिशय धोक्याचे आहे. आधीच ऑईल रिफायनरीज, भाभा


हंसा वाडकर यांचे आत्मकथन

सांगत्ये ऐका

सांगत्ये ऐका

मूल्य आठ रुपये

राजहंस प्रकाशन

परमाणु केन्द्र यासारख्या महत्त्वाच्या संख्या आणि शेकडो कारखाने मुंबईत आहेत शत्रूच्या बाँबहल्ल्याचे मुंबई शहर आधीच एक आदर्श लक्ष्य आहे. त्यात अशाच प्रति-मुंबईची भर पडली तर मग विचारायलाच नको.

मागे काही दिवसापूर्वी संरक्षण खात्याचे राज्यमंत्री श्री. महिदा यांनी एका ठिकाणी भाषण करताना सांगितले होते की, पाकिस्तानच्या बाँब हल्ल्याचे पहिले लक्ष्य मुंबई शहर असेल. मग असे असताना आणखी दुसरी मुंबई अगदी समुद्राच्या तोंडाशी कशाला बसवायची ? एखाद्या माणसाच्या व्हिमसाठी साऱ्या देशाला धोक्यात लोटायचे. स्वर्गीय भाभांना परमाणु केन्द्र ट्रॉम्बेतच हवे होते म्हणजे ते त्यांना त्यांच्या घरापासून जवळ पडेल; आणि दुसरे तारापूरलाच हवे होते म्हणजे तेथे त्यांना त्यांच्या शिडाच्या होडीत बसून जाता येईल. म्हणून त्यांचा आग्रह होता म्हणतात. खरे खोटे कुणास ठाऊक. पण आता ही दोन्हीही परमाणु केन्द्रे अगदी समुद्राच्या तोंडाशी झालेली आहेत आणि शत्रूच्या बाँब हल्ल्याचे पहिले लक्ष्य ही केन्द्र सहज बनू शकतात. अशी चूक पुन्हा जुळी-मुंबईच्या बाबतीत तरी होता कामा नये असे या विरोधकांचे म्हणणे आहे. काय विकास करायचा तो आत करा किंवा मुंबईपासून दूर करा असे ते म्हणतात.

महाराष्ट्र सरकारच्या मंत्र्यांचे मत अर्थातच असे आहे की हा विरोध राजकीय स्वरूपाचा आहे. प्रति-मुंबईच्या निर्मितीमध्ये प्रचंड प्रमाणावर नोकऱ्या उपलब्ध होतील. ते एक महाराष्ट्राला वरदानच ठरेल. ते लाथाडणे म्हणजे शुद्ध मुर्खपणा. शिवाय प्रति-मुंबईचे न्हावा–शेवा बंदर ही अत्यंत निकडीची गरज आहे. नव्या प्रचंड वजनाच्या मालवाहू बोटी सध्याच्या मुंबई बंदरात येऊच शकणार नाहीत. नव्या बंदरात त्या येतील. सध्या मँगनीजची मागणी जगभर वाढली आहे. त्यामुळे विदर्भातल्या मँगनीजच्या खाणी पुन्हा सुरू झाल्या आहेत. पण मुंबई बंदर इतके गच्च भरले असते की हा मँगनीज परदेशी पाठवायचा झाल्यास विशाखापट्टणहून पाठवावा लागतो. हा मँगनीज नव्या मुंबई बंदरातून हाताळता येईल. आणि कोकणच्या मुख्य भूमीला लागून असलेली प्रति-मंबई तयार झाली की कोकणच्या विकासाला उशीर काय लागणार ? वगैरे.

जुळी मुंबई वाईट की चांगली हा वाद आणि त्यावर आंदोलने जरी जोरात चालू असली तरी ज्या संस्थेच्या हाती जुळ्या मुंबईचे काम आहे त्या सिडकोची पावले वेगाने पुढे पडतच आहेत. थोड्याच दिवसात या वादाला केवळ तात्त्विक स्वरुप येईल. कारण तोवर नव्या मुंबईची अर्धी अधिक तयारी पूर्णही झालेली असेल.

□ □ □

# मराठवाड्याची हालचाल

देवदत्त तुंगार

## नांदेडला विद्यापीठ उपकेंद्राची मागणी

औरंगाबाद येथे १९५८ साली २३ ऑगस्ट रोजी कै. पंडित नेहरूंच्या हस्ते मराठवाडा विद्यापीठाचे उद्घाटन झाले. मराठवाड्याच्या पाच जिल्ह्यासाठी स्वतंत्र विद्यापीठाची काय गरज आहे अशी टीका त्यावेळी करण्यात आली. पू. स्वामी रामानंद तीर्थ, डॉ. आंबेडकर व इतर नेत्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात मराठवाड्यासाठी वेगळे विद्यापीठ हवे या मागणीला उचलून धरले होते. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी ही मराठवाड्याची मागणी मान्य केली. औरंगाबाद येथे विद्यापीठ स्थापनेनंतर मराठवाड्यात शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होऊ लागला असून तालुका पातळीवरही अनेक महाविद्यालये निघाली आहेत. नांदेडलाही एक विद्यापीठ निघावे अशी भावना शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्यात बोलली जात असून यंदा विद्यापीठ वर्धापन दिनाच्या प्रसंगी शासकीय शिक्षण महाविद्यालयात व्याख्यान देताना मी या मागणीवर जोर दिला व प्राचार्य राऊळकर आदींनी त्यास पाठिंबा दिला. नांदेडला विद्यापीठाचे निदान उपकेंद्र तरी त्वरित द्यावे अशा हालचाली सुरू झाल्या असून नांदेड युवक संघाने तशी मागणी केली आहे.

नांदेडला यशवंत, पीपल्स व सायन्स अशी तीन कॉलेजे आहेत. एम. ए. एम. कॉम. व काही विषयातील एम्. एस्. सी. शिक्षणाची सोय आहे. लवकरच मेडिकल कॉलेज निघण्याची शक्यता आहे. भोवतालच्या परिसरातील उच्च शिक्षणाच्या संस्था वाढत आहेत. त्यामुळे विद्यापीठाचे उपकेंद्र तर नांदेडला लवकरच मिळेल परंतु भावी काळात स्वतंत्र विद्यापीठ मिळायला हवे. त्याखेरीज नांदेडकरांचे समाधान होणार नाही.

## उस्मानशाही मिलचे काय होणार ?

नांदेडला उस्मानशाही मिल असून सुमारे पाच हजार लोकांना त्यामुळे उपजीविकेचे साधन मिळते. सदर मिल डबघाईला आली असून (आणली असून ?) त्यामुळे सरकार ती ताब्यात घेणार काय असा प्रश्न चर्चिला जात आहे. ना. नरेंद्र तिडके यांनी या संदर्भात केलेल्या वक्तव्यामुळे चर्चेला चालना मिळाली. उस्मानशाही मिलचे मालक श्री. हरिदास मुंदडा यांनी कामगारांना नुकतेच

सांगितले की मिळला १ कोटी ३२ लाख रुपयाची मदत शासनाने बिनशर्त देऊ केली असून आता कारभार सुरक्षित (?) होईल.

दोन मे १९७० रोजी झालेल्या करारानुसार कामगारांना महागाई भत्ता-वाढीची थकबाकी या महिन्याअखेर मिळायला हवी. पण अजून 'तशी' चिन्हे दिसत नाहीत, म्हणून २६ डिसेंबरला संप व दोन जानेवारीपासून धरणे धरण्याचा कार्यक्रम कामगारांनी आखला आहे.

## आयुर्वेद कॉलेजचे भवितव्य

मराठवाड्यात नांदेड येथेच् सरकारी आयुर्वेद कॉलेज आहे. पण त्यावर गंडांतर आले असून तेथील प्राध्यापकांचे भवितव्य धोक्यात आले आहे. बी. ए. एम. एस. अभ्यासक्रम बंद करण्यात आला आहे. जूनपासून नवा कोणता अभ्यासक्रम सुरू करण्याची अजून योजना नाही. काही प्राध्यापकांचे 'रिपॅट्रीएशन' व काहींचे 'टर्मिनेशन' होणार असे विश्वसनीय गोटातील वृत्त असल्याने अध्यापकवर्गात असंतोष निर्माण झाला आहे. नांदेडला मेडिकल कॉलेज निघणार असल्याची दाट वदंता असून सध्याच्या आयुर्वेद कॉलेजची इमारतच त्यासाठी वापरावी असा सरकारचा मानस दिसतो. नांदेड येथेच मेडिकल कॉलेज जरूर निघावे पण सध्याचे आयुर्वेद कॉलेज त्यासाठी बंद करू नये अशी मागणी करण्यात येत आहे. नागपूर, नांदेड व मुंबई येथे सरकारची आयुर्वेद कॉलेजे आहेत. नांदेडला नुकतीच भव्य इमारत उभारण्यात आली आहे. पण आयुर्वेदासाठी बांधण्यात आलेली इमारत मेडिकल कॉलेजसाठी वापरण्यात येणार व एक प्रकारे आयुर्वेद शास्त्राची उपेक्षा होणार याबद्दल अनेकांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

## यशवंत कॉलेजात बेत-बाजी

नांदेडच्या यशवंत महाविद्यालयात बेत-बाजीचा एक अभिनव कार्यक्रम अत्यंत रंगतदार झाला. मराठीमध्ये ज्याप्रमाणे 'भेंड्यां'चा खेळ असतो. तसाच उर्दूमध्ये 'बेत-बाजी' खेळ आहे. उर्दूतील 'लचक' आणि 'नजाकत' यामुळे हा खेळ विशेष रंगतो. एका बाजूला काही विद्यार्थी व दुसऱ्या बाजूला काही विद्यार्थिनी असा दोन गटात झालेला बेत-बाजीचा हा कार्यक्रम मराठवाड्यातील कॉलेजमध्ये माझ्या माहितीप्रमाणे पहिलाच आहे. यशवंत कॉलेजने त्याचे श्रेय पटकाविले. सुमारे तासभर चाललेल्या कार्यक्रमाचा निकाल उत्साहवर्धक आहे. कारण विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांवर 'भेंड्यां'मध्ये मात केली. विद्यार्थिनी विजयी झाल्या. उर्दूतील बेत-बाजीच्या कार्यक्रमाप्रमाणे मराठी, हिंदीमध्येही असा भेंड्यांचा खेळ खेळण्यात यावा असे या प्रसंगी प्राचार्य गो. रा. म्हैसेकर यांनी सांगितले. बेत-बाजीचा कार्यक्रम यशस्वीपणे आयोजन करण्याचे श्रेय माझे मित्र उर्दूचे प्राध्यापक श्री. जाकीर हुसेन फारूकी व श्री. सिद्दीकी यांना दिले पाहिजे. ☐ ☐ ☐

# युवक महोत्सव पुणे विद्यापीठ

**वरुण भिडे**

विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण समितीतर्फे विद्यार्थ्यांच्या अंगातील कलांना उत्तेजन देण्यासाठी दरवर्षी एक युवक महोत्सव आयोजित केला जातो. या महोत्सवात प्रामुख्याने ललित कलांविषयी विविध स्पर्धा घेतल्या जातात. या महोत्सवाची गेली काही वर्षांची प्रगती पहाता निश्चितपणे आशादायक आणि दर्जेदार स्पर्धा होतात असे म्हणता येईल. पुष्कळ वेळा अशा उत्सवांना बाजारी स्वरूप येते ते टाळण्यात विद्यापीठ यशस्वी झाले आहे. यामध्ये पुष्कळ प्रमाणात कल्याण समीतीचे वा. ना. भिडे यांचे श्रम कारणीभूत आहेत हें कबूल करावयाला पाहिजे.

गेली काही वर्षे हा महोत्सव पुण्याबाहेर केला जात असल्याने मोठ्या उत्साहाने साजरा होतो. यावर्षीही संगमनेरकरांनी अमाप उत्साहाने हा कार्यक्रम यशस्वी केला. केन्द्रीय राज्यमंत्री अण्णासाहेब शिंदे यांनी या शाही समारंभाचे उद्घाटन केले. यावर्षी स्पर्धांमध्ये सत्तेचाळीस महाविद्यालयांनी भाग घेतला होता. अर्थातच विविध स्पर्धांमध्ये अनेकांनी भाग घेतल्याने तीन दिवस भरगच्च कार्यक्रम चालू होते. स्पर्धांमध्ये सर्वात महत्त्वाची स्पर्धा म्हणणे एकांकिका स्पर्धा. या स्पर्धेत पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजने सादर केलेल्या पु. ल. देशपांडे लिखित ‘नाही आसू नाही माया’ या एकांकिकेला पहिला क्रमांक मिळाला. ही एकांकिका अतिशय उत्तम रीतीने बसवली गेली होती. टीमवर्क वाखाणण्याजोगे होते. दीपक ओक, सुधीर गाडगीळ, ज्योति जुठानी आणि मंगला बनवट यांनी अतिशय समजून कामे केली. दीपक ओक व सुधीर गाडगीळ यांना अभिनयाचे पहिले आणि दुसरे पारितोषिक मिळाले. मुलींमध्ये कु. ज्योति जुठानी यांना पहिले पारितोषिक मिळाले. कु. बनवट यांना पारितोषिक नसले तरीही मराठी रंगभूमीने एका ठसकेबाज नायिकेची अपेक्षा ठेवायला हरकत नाही. या एकांकिकेच्या दिग्दर्शनाचे श्रेय प्रा. एम. सी. दीक्षित यांना आहे. त्यांनाही दिग्दर्शनाचे पहिले पारितोषिक मिळाले.

या स्पर्धेमध्ये बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद कॉलेजला दुसरा क्रमांक आणि संगमनेर महाविद्यालयाच्या 'सांगाती'ला तिसरा क्रमांक मिळाला. या दोन्ही महाविद्यालयाचे संघ सरस होते. त्यांनी अभिनयही चांगला करून पुणेकरांपेक्षा आम्ही फार मागे नाही हे दाखवले. या स्पर्धेत पारितोषिक न मिळालेली परंतु उत्कृष्ट झालेली एकांकिका म्हणजे पुण्याच्या विधी महाविद्यालयाची 'खलित्यांची लढाई' ...ही एकांकिका यशस्वी होण्यात रमेश टिळेकर यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांना तिसरे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. या एकांकिकेला पारितोषिक न देण्याचे कारण म्हणे...'ही एकांकिका नव्हे'.. अनेक स्पर्धात ही न-एकांकिका चालली, स्पर्धेत प्रवेश देताना देखील चालली आणि स्टेजवर मात्र ती एकांकिका ठरली नाही याची मोठी गंमत आहे. असो, शेवटी परीक्षक देवो भव हेच खरे. या स्पर्धात नमूद करण्यासारखा योगायोग म्हणजे कॉमर्स कॉलेजने हीच एकांकिका काही वर्षीपूर्वी केली होती आणि बक्षीसेही अशीच मिळवली होती. तसेच लॉ कॉलेजच्या टिळेकर यांना त्याच भूमिकेबद्दल पारितोषिक मिळाले होते.

एकांकिका स्पर्धाबाबत संगमनेरकरांनी भलताच उत्साह दाखवला. गावापासून दूर असणाऱ्या सभागृहात दिवसभर प्रेक्षकांची तुडुंब गर्दी असे. याबद्दल बोलताना प्राचार्य कौंडिण्य म्हणाले..'या गावाच्या आयुष्यात कधी असा मोठा प्रसंग आलाच नाही. सगळे गाव उत्साहानी लोटण्यासारखा यापूर्वी एकच मोठा प्रसंग म्हणजे बऱ्याच वर्षापूर्वी झालेला एक लग्न समारंभ'... एकंदर विद्यार्थी आणि गावकरी दोघेही एकमेकांवर बेहद्द खूष होते.

या स्पर्धेखेरीज झालेल्या स्पर्धांपैकी काही प्रमुख स्पर्धा म्हणजे शास्त्रीय संगीत, शास्त्रीय वाद्य वादन, नृत्य, कला व कुसर (Art & Craft). शास्त्रीय संगीतामध्ये फर्ग्युसन महाविद्यालयाच्या पद्मा वाकडे यांना प्रथम क्रमांक मिळाला. कु. शोभना जोशी या गुणी गायिकेला तिसरा क्रमांक देऊन थोडासा अन्याय केला असे म्हणावेसे वाटते. नृत्याच्या स्पर्धेत पुण्याच्या दोनच विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. अर्थातच त्यांना दोघीत दोन बक्षीसे मिळाली. अर्थात दोघींचा दर्जा चांगला होता. नेस वाडियाच्या कु. राधिका संपतकुमार यांनी प्रेक्षकांना खूष केले. त्यांना दुसरा क्रमांक मिळाला तर फर्ग्युसनच्या कु. संध्या आपटे या पहिल्या विजेत्या ठरल्या.

शास्त्रीय वाद्यवादनात तीनही पारितोषिके पुणेकरांना मिळाली. कु. शिरगोपीकर या विद्यार्थिनीने अत्यंत उत्तम तबला वादन करून प्रथम क्रमांक मिळवला. अतिशय आत्मविश्वासाने आणि पुरुषांसारख्या सफाईने तबला वाजवला. तबला हा प्रकार साधारणपणे पुरुषांचा प्रांत असूनही या गोड हाताच्या विद्यार्थिनीने सर्वांना जिंकले. कु. सुनीता अय्यंगार आणि प्रशांत अय्यंगार यांनी सतार आणि व्हायोलीन सादर केले.

चित्रकला वगैरे स्पर्धात फारशा आकर्षक कलावस्तू नव्हत्या. परंतु विशेषत:

श्री. बारभाई यांचे निसर्गचित्र वाखाणण्यासारखे होते. त्यांनी पहिला क्रमांक मिळवला. एकांकिका लेखन स्पर्धात पहिले पारितोषिक कोणालाही मिळाले नाही. श्री. खेर आणि राजदरेकर यांना दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळाला. सुहास तांबे यांच्या एकांकिकेला बक्षीस न मिळाल्याचे अनेकांना आश्चर्य वाटले. अर्थात ही स्पर्धा उघड नसल्याने दुरून काहीच अंदाज करता येत नाही हे खरे आहे.

स्पर्धांमध्ये काही स्पर्धकांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली. गायकांपैकी सुधीर दातार, मीना हसबनीस आणि विजय बक्षी, तसेच वादकांपैकी किशोर रायबागकर आणि राजेंद्र पटवर्धन या हक्काच्या मानकऱ्यांनी आपली हजेरी का लावली नाही हे समजत नाही. तसेच एस. पी. कॉलेज आणि नाशिक कॉलेज यांच्या एकांकिका नेहेमी मोठ्या दर्जेदार असतात. यावर्षी मात्र त्यांचे प्रयोग सामान्य झाले.

हा युवक महोत्सव विद्यार्थ्यांच्या बरेच दिवस लक्षात राहील. कोणच्याही तऱ्हेची चिडाचीड, भांडणे न होता मोठ्या शाही थाटाने आणि आणि संगमनेर-करांच्या अमाप उत्साहाने अधिक रंगतदार रीतीने पार पडला. मात्र शेवटच्या दिवशी समारोपाच्या प्रसंगी तिसऱ्या क्रमांकाची एकांकिका करण्यात काय औचित्य होते हे समजत नाही. पाहुण्यांना दाखवायचीच तर तिसरी एकांकिका का ? या प्रकाराबद्दल सर्वांनीच तीव्र नापसंती व्यक्त केली. त्यात भर म्हणून ही एकांकिका फक्त एकोणीस मिनिटात गुंडाळली गेली. कदाचित यजमान म्हणूनही हा मान दिला असण्याचा संभव आहे. हे गालबोट सोडले तर समारंभ अतिशय उत्तम झाला. आजपर्यंत झालेल्या युवक महोत्सवांपेक्षा हा महोत्सव रंगदार झाला.

◻ ◻ ◻


# व्होल्गा जेव्हा लाल होते

**ले. : वि. स. वाळिंबे**

**मूल्य : अठरा रुपये**

**राजहंस प्रकाशन**



सांस्कृतिक मुंबई । रवींद्र पिंगे

# जेव्हा कलावंत फुलून येतो

"माझ्या हातात काय आहे ? साधी दोन गुलाबाची फुलं. पाहिलीत ? पहा, पहा त्यांचे उत्फुल्ल ताजेतवाने रंग; पहा, ह्यांचे गोंडस आकार; पहा ह्यांच्या रेशमी सुकुमार पाकळ्या. ह्यांचा सुगंध किती मंद नि दिलचस्प आहे. ह्या डहाळीबरोबर त्यांनी तोल पहा किती सुरेख साधला आहे. ही फुलं म्हणजे निसर्गाची जादू आहे; देवाची देणगी आहे. सावलीसारखी ही आपल्याला साथ देतात. जन्मोत्सव असो, पूजाअर्चा असो, गाठीभेटी असोत, लग्नमुंजी असोत, यशयात्रा असोत की अंत्ययात्रा असोत—माणसाला सोबत करतात फक्त फुलंच. माणसाबरोबर चितेवर चढतात फक्त फुलं. आहे असा कुणी शक्तिमान की जो अशी फुलं निर्माण करून दाखवील ? छे. ही तर निव्वळ निसर्गाची देणगी. मी चित्रकार आहे. तुम्हीही असाल. रंगाचे आपण स्वामी आहोत. पण अशीच्या अशी फुलं काढता येणं आपल्या नशिबात नाही. आपण ह्यांची नक्कल करू शक. नक्कल करणं सोपं आहे. अस्सल आपल्या शक्तीबाहेरचं आहे."

चौपाटीवरल्या जादूगार बंगालीबाबूच्या अविर्भावात साठीकडे झुकलेला तो

काळा चित्रकार सर्वांना सांगत आहे. त्याने आपल्या रंगीत चित्रांचं प्रदर्शन भरवलं आहे. तो काढतो फक्त फुलं, पानं, कुंड्या, गाडगी-मडकी. किंवा विवस्त्र रंभा. तिसऱ्या कुठल्या गोष्टीला त्याने हात घातलेला नाही. हे एकसूरी रंगकाम तो उणीपूरी चाळीस पंचेचाळीस वर्ष सतत करीत आला आहे. त्याच्या मते चित्रांच्या खपात त्याचा हात धरणारा दुसरा कुणीच नाही. त्याने पन्नास चित्रं लावली तर त्यातली निम्मी चित्रं पहिल्या दिवशी सलामीलाच विकली जातात. उरलेली निम्मी चित्रं आठवडाभरात विकली जातात. प्रदर्शनाचा खटाटोप कधी त्याच्या अंगाशी येत नाही. मी स्वतः त्याची प्रदर्शनं सातत्याने गेली पंचवीस वर्ष पहात आलो आहे. तेव्हाही तो मखमली, गेंदेदार, कोमल फुलंच घवघवीत तेलीरंगात चितारायचा- जशी तो आजमितीसही परोपरीनं रंगांकित करीत आहे. पंधरा वर्षांपूर्वी त्याने स्टंट केला. प्रत्येक पुष्पचित्राची ठोक किंमत उक्ते रुपये पन्नास ठेवली. बाजारात फळांच्या परड्या मांडून ठेवलेल्या असतात तशी ती चित्रं हारीने मांडली. आणि अपेक्षित यशाचा तो धनी झाला. बघता बघता त्याची सर्व चित्रं विकली गेली. रुपये खिशात घालून तो निघून गेला. कुठे ?

चौपाटीजवळच्या एका चाळीतल्या त्याच्या एक खोली मकानात. मी त्याच्या घरी गेलो. तो एकटाच बसलेला होता. भिंतीला चित्रं टेकलेली होती. दाराच्या गणेशपट्टीवर सावंतवाडीकडल्या लाकडी बाहुल्या चिकटवलेल्या होत्या. एक स्टोव्ह होता. अर्धं कापून ठेवलेलं सफरचंद होतं. भिंतीवर वृत्तपत्रातल्या बातमीचा एक कागदाचा कपटा गोंदाने चिकटवलेला होता. कुतूहलाने मी तो मजकूर वाचला. एका टॅक्सी ड्रायव्हरने गिऱ्हाईक विसरून गेलेलं पैशाचं पाकीट इमान राखून परत केलं अशा आशयाचा तो मजकूर होता. मी म्हटलं, " ह्या बातमीत विशेष काय आहे ?" तो हसत हसत उत्तरला, "माणूस नावाची चीज अजून शाबूत आहे ह्याचा तो दाखला आहे !" मग तिथून उलटच्या दिशेने गप्पा सुरू झाल्या. तो एकटा जीव सदाशिव होता. चेहेऱ्यावरून किरिस्ताव वाटला. मराठी बोलण्यावरून आदिवासी भागातला वाटला. स्वतःच रोट्या बडवून खात होता. स्वतःच कपडे धूत होता. म्हणाला, "पहिलं महायुद्ध सुरू झालं तेव्हा एका मोटर ड्रायव्हरच्या पोटी माझा जन्म झाला; मी निझामीतला हिंदू आहे." मला वाटलं निझामीतल्या जुलूमी सावलीतलं दलीत वर्गीय हिंदूचं जीवन आता कळेल. पण तो म्हणाला, "नाही; मी तीन वर्षांचा असताना आई वारली, म्हणून बालवयातच पोटापाण्यासाठी मुंबई गाठली. घरगड्याची नोकरी पकडली. बाप मोटार चालवायचा. मी मोटार धुवून द्यायचा. आम्ही जोडीने काम करायचो. पण बाप ऐन उमेदीत मेला. मी पोरका झालो. इतक्यात गांधीजींचा मीठाचा सत्याग्रह सुरू झाला. मी सत्याग्रही झालो. चांगला पाच महिने तुरुंगात होतो. सुटलो, तर पोटाचे वांधे ! पुन्हा मोटारी धुवायला लागलो. हे काम करीत असताना एक चित्रकार साहेब भेटला.

तो चित्र काढताना मी पाहू लागलो. आपणही हातात कुंचला धरावंसं वाटू लागलं. साहेब महामना होता. मोटारधुव्या म्हणून त्याने मला दूर लोटलं नाही. उलट जवळ केलं. कुंचला कसा धरायचा शिकवलं. रंग कसे मिसळायचे ते शिकवलं. पैसे दिले. शिवाय दुसऱ्या शौकीन साहेबांच्या ओळखी करून दिल्या. असा तो महामना चित्रकार साहेब–त्याचं नाव वॉल्टर लँगहॅमर! त्याच्या काळातला खलीफा. तो भेटला हे पहिलं भाग्य. त्याने इतरांच्या भेटी घडवल्या हे दुसरं भाग्य नि मी त्याची नक्कल न करता माझ्या स्वतंत्र शैलीने रंगकाम करू लागलो हे तिसरं भाग्य !"

गोऱ्या साहेबांना किमानपक्षी गुणांची तरी कदर असायची. म्हणून लेडन, जेरार्ड वगैरे चित्रकारांनी ह्या भणंग मोटारधुव्याला जवळ केलं आणि कुंचल्यावर संस्कार केले. नेटकं पाहण्याची उपजत देणगी आणि तिचा स्वतःच्या ठशात स्वतंत्र आविष्कार करण्याची जागरूकता, ह्या विद्यांच्या जोरावर हा कलावंत म्हणून जगू लागला. रझा, सौझा, पळशीकर वगैरे नव्या शैलीकार चित्रकारांच्या खांद्याला खांदा लावून प्रदर्शनं भरवू लागला. जोडीस 'हम लोग' 'असमान' वगैरे डावऱ्या चित्रपटांचं कला दिग्दर्शन करू लागला. त्याने दुसरं काहीच केलं नाही. फक्त चित्रं काढली. हजारोंनी काढली. नि प्रदर्शनं मांडून ती विकली. किती ? अडीच हजार चित्रं, असा हिशेब निघेल ! असा एक देश नसेल की जिथे त्याचं चित्र प्रेक्षकांचं चित्त खिळवून घेत नसेल.

आजही सर्वांचे डोळे, तो करून दाखवीत असलेल्या रंगीत रेखाटनांच्या प्रात्यक्षिकावर खिळलेले आहेत. प्रदर्शनं सगळेच भरवतात. त्यातले नशिबवान पैसेही कनवटीला लावतात. पण आपण रंगकाम कसं करतो हे कुणी कुणाला दाखवीत नाही. आज ह्याने हा योग घडवून आणला आहे. तो दोन ताणलेले फलक ठेऊन कलाकृतीचा आस्वाद कसा घ्यायचा ते हरदासी शैलीत, विनोद फुलविण्याचा कष्टप्रद प्रयत्न करीत सांगत आहे. दोनशे माणसं त्याला गराडा घालून आहेत. त्याने फक्त तीन रंग आणले आहेत. ठार काळा, हिरवा जर्द आणि पिवळा धम्मक. भींतीला रंग द्यायला वापरतात तसले फत्ताडे ब्रश त्याच्या हातात आहेत, नि जाड थरांचे तो फटकारे मारीत सुटला आहे. पाच मिनिटात तो चित्र पुरं करून दाखवीत आहे. सागत आहे, " हीं झाली फुलं. सूर्यफूलं. पण सूर्यफूल जड असतं. भरीव असतं. सूर्यफूलाचा तो जीव ह्या चित्रात आणला पाहीजे. त्यासाठी मी ह्या एकाच चित्रावर महिनाभर रंगकाम करतो !"

रंगांच्या मिश्रणांची आणि वलयदार आकारांची जादू आम्ही पहात आहोत. एका फटकाऱ्यात त्याने स्त्रीची विवस्त्र पाठ काढून दाखवली आहे. फालतू चित्रकार हेच चित्र उत्तान करून कसं बिघडवून टाकेल, तेही स्वतःचं चित्र सहजगत्या बिघडवून दाखवीत आहे. चित्रकलेतला–किंबहुना सर्वच कलांच्या सिद्धीचा मंत्र तो

त्याच्या रांगड्या पण अनुभवसिद्ध भाषेत सांगत आहे : चित्रकाराचा स्वतःच्या मनावर ताबा पाहिजे. तो ‘स्वयं’ हवा. सोपेपण त्याने टाळलं पाहिजे. टाळी टाळली पाहिजे आणि मुख्य म्हणजे समोरच्या दृश्यातलं काय टाळायचं हे त्यानं ओळखलं पाहिजे. नग्न स्त्रीचित्रातली नग्नता टाळून सनातन आणि सचेतन स्त्रीत्व पाहिलं पाहिजे. आणि लक्षात ठेवा, कलाकृतीला क्रिएटीव्ह टच् नेमका कुठे, नि केवढा द्यायचा, हे ज्याने त्याने स्वतःचं स्वतःच ओळखलं पाहिजे. ‘क्रिएटीव्ह टच’ ज्याला कळला तो कलावंत. उरलेले सगळे कारागीर. नक्कलवाले.

गडदरंगी प्रचंड चित्रफलक पाहून नजरा निवत आहेत. चित्रात फुलांना बहर लगडलेला आहे. विवस्त्र स्त्रीदेहातल्या पुष्टपणाच्या आडून ओसंडणारं स्त्रीत्वातलं मार्दव काळजाला भिडत आहे. मांडलेल्या प्रत्येक चित्रातलं डाव काय नि उजवं काय, ते चित्रकार समजावून सांगत आहे. मोठ्या किमतीला विकलं गेलेल्या एका नग्न चित्राकडे बोट दाखवून तो छातीठोकपणे सांगतो आहे, “हे चित्र कलाकृती म्हणून कमजोर आहे. पण ह्यातल्या पुष्ट नग्नतेला भुलून कुणा लक्ष्मीधराने मला चारशे रुपये दिले. त्याच्या गळ्यात वाईट चित्र अडकलं. माझं बरंच झालं. मला चारशे रुपये सुटले !”

स्वतःकडे इतक्या अलिप्तपणे कुणी कधी पहात नाही. एखादाच निःसंग कलावंत ते धैर्य दाखवतो. कल्ले वाढवून एकाकी जीवन जगणाऱ्या, बाहेरून फाटक्या दिसणाऱ्या, पण आतून कुठून तरी फुलून आलेल्या अशा धैर्यवान आणि क्रिएटीव्ह टच असलेल्या निःसंग कलावंताचं नाव असतं कृष्णाजी होवलाजी आरा.

इकडे–तिकडे

सु. ल. सोमण

# शिक्षक, विद्यार्थी, नोकरी, ज्ञान वगैरे वगैरे

धुळे जिल्ह्यातल्या दोंडाईचे येथील महाविद्यालयात, वादविवाद मंडळाच्या विद्यमाने नुकतंच प्रिन्सिपॉल सावंत यांचं एक भाषण झालं. आंतरराष्ट्रीय शैक्षणिक वर्षाची पूर्वपिठीका समजावून सांगितल्यावर प्रिन्सिपॉलसाहेबांनी, शिक्षकांना सध्या समाजात मिळणाऱ्या वागणूकीविषयी तक्रार केली. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षकांविषयीची श्रद्धा कमी होऊन, त्याच्याकडे वघण्याचा दृष्टिकोन 'नोकर' असा झाला आहे, 'ज्ञानदाता' राहिला नाही असंही प्रिन्सिपॉलसाहेबांनी सांगितलं.

वास्तविक प्रिन्सिपॉलसाहेबांना एवढी लांबलचक तक्रार करण्याचं तसं काहीच कारण नव्हतं. शिक्षक हल्ली तसं काय ज्ञानदानाचं विशेष असं कार्य करतात हो ? नेमून दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करून घेण्याच्या पाट्या टाकण्यापलीकडे मला तरी वाटतं काही करत नाही. आता सरकारनंच काही साफसफई, सूतकताई. भाषणंभिषणं, ट्रीप्स त्यांच्या माथी मारल्या तर गोष्ट वेगळी. पण एरवी बहुतेक सर्व 'ज्ञान' विद्यार्थ्यांना वाहेरच घ्यावं लागतं न् ते ती इतकं व्यवस्थित घेतात की अनेकदा त्यांनाच 'अनेक बाबतीतलं' ज्ञान त्यांच्या शिक्षकांपेक्षा अधिक असतं. चित्रपट नायक–नायिका, सिनेमे व सिनेमेवाल्यांची लफडी, शाळा–कॉलेजातल्या झाडून साऱ्या पोरी, नवे नवे हातभटचांचे नि सिगरेट्सचे ब्रॅण्ड्स् ह्या साऱ्या परंपरागत बाबतीत तर ते पुढे असतातच, पण सध्याच्या समाजवादी युगातल्या अद्ययावत ज्ञानातही ते निश्चितच त्यांच्या शिक्षकांच्या दोन पावलं पुढेच असतात ! आपला चॅलेंज आहे ह्या बाबतीत. संप, घेराव, मोर्चे, दगडफेकी, सोडावॉटरच्या बाटल्यांनी मारामारी, डिफेक्शन्स... ( आणि हो 'निरोध' राहिलंच हं ! ) ह्या कुठल्याही बाबतीत आजच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांपेक्षा कमी 'ज्ञान' असल्याचं कुणीही सिद्ध करून दाखवावं. (एखादा अपवाद कदाचित निघेलही म्हणा ! ) मग कसलं कपाळाचं 'ज्ञानदान' शिक्षक करणार हो ? त्यांनी आपली नुसती 'बुकं' पढविण्याची नोकरीच करावी !

आता उरला प्रश्न शिक्षकांविषयी आदर वाटण्याचा. हल्लीच्या शिक्षकात मी तर म्हणतो काही दमच उरलेला नाही. बेटे विद्यार्थ्यांना टरकूनच असतात.

क्वचित विद्यार्थ्यांवर कुरघोडी करणारा असलाच एखादा, तर बेटा तोही सरपंचांना नाहीतर पंचायतीच्या सभापतींना नाहीच तर सरकारी नियमांना वचकून असतो. असला टरकलेला मास्तर कसला आदरणीय ठरणार ? माझ्या लहानपणीचे आमचे मास्तर मला आठवतात. वर्गात शिरता शिरताच गर्जना करायचे, 'भडवीच्यांना, अभ्यास करून नसेलच आणला. हात पुढे करा सगळी.' आणि मग अभ्यास आणला असो–नसो, सर्वांच्या हातावर सपासप छड्या ओढायचे. (हा खरा फर्मास समाजवाद. नाही ?) एवढा 'श्रीगणेशा' झाला की मगच मास्तर शिकवायला सुरुवात करायचे. काय बिशाद होती कुणाची मास्तरांचा अनादर करायची ! आजही गावी गेलं आणि मास्तर दिसले, की चळाचळा कापायला होतं. मास्तरहीं अजून त्याच दमात विचारतात, 'गाढवीच्या, एवढा मोठा झालास, शिकलास पण काही अक्कल आली का ?' मास्तरांचं नवीन लफडं कळलेलं असूनही मास्तरांसमोर खाली मान घालून उभं राहावं लागतं.

कुठे पूर्वीच्या मास्तरांचा हा दरारा आणि कुठे हल्लीचे डरपोक शिक्षक. परवाच कुठल्याशा शाळेतल्या मास्तरानी त्याच्याच वर्गातल्या अकरावीतल्या मुलीशी लग्न केलं तर त्याला म्हणे, त्या मुलीसह त्या गावातनं पलायन करावं लागून मुंबई गाठावी लागली.

आता अशा परिस्थितीत, कुठला आलाय शिक्षकाचा दरारा ? आणि कुठे मिळणार त्यांना आदर ? अरे महाराजा, आदरही, 'प्रेमा'प्रमाणेच संपादावा लागतो. उगीच बेटे तक्रारी करत बसतात !

## लोकशाही, समाजवाद : इन डेंजर !

मद्रास न्यायालयाने मागच्या आठवड्यात एका भूतपूर्व उपमंत्रीणबाईला सहा महिन्यांची सक्तमजूरी ठोठावली. कारण काय तर म्हणे ह्या बाईंनी लाच घेतली. एका विद्यार्थ्याला मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी, एका शिक्षिकेची तिला हव्या असलेल्या गावी बदली करून देण्यासाठी.

काही दिवसांपूर्वी बिहारातल्या मंत्र्यावरील असेच आरोप शाबीत होऊन, चौकशी समितीनं त्यांना दोषी ठरवलं. महाराष्ट्रातल्या एका उपमंत्र्याविरुद्धच्या आरोपाची फाईल सध्या 'बाई' दिल्लीत हाताळीत आहेत. मुंबईतल्या आमदार निवासातल्या भानगडींचे पडसाद अधून मधून उठतातच. (त्यातच नागपूरला नवीन आमदार निवास उभं राहिलं आहे !) लोकसभेत व बाहेरही मंत्र्यांच्या एकेका भानगडीविषयी सतत कुजबुज सुरूच असते. खा. मधु लिमये तर अशा भानगडी चव्हाट्यावर मांडण्यात आता गाजलेले 'स्पेशॅलिस्ट' बनले आहेत...

शी ! शी !! शी शी शी !!! वरचे दोन परिच्छेद वाचताना काहीतरीच वाटतं नाही. वास्तविक मंत्री, उपमंत्री, आमदार, खासदार आणि अर्थातच सारे पुढारी – ही सारी मंडळी आहेत म्हणून इथे लोकशाही आहे. ही मंडळी आहे म्हणून, (आणि केवळ म्हणूनच हं !) इथे प्रत्यक्ष समाजवाद नसला तरी समाजवादाची भाषा तर आहेच आहे ! आणि मंत्र्यांवर आरोप करून ते सिद्ध करायचे ? काही लोकशाहीची, समाजवादाच्या भाषेची तर लाज वगैरे ? साऱ्यांनी कसा ताळतंत्रच सोडला आहे. मंत्री, पुढारी वगैरेंवर टीका करायची त्यांना अनुषंगून वाह्यात कोटया रचायच्या ही आजकाल नवी फॅडच निघाली आहे. ह्या अशा छोटया करणारांना, लेकाच्यांना, खरं म्हणजे काही कळतच नाही.

ह्या मंत्र्यांवर टीका करायची, त्यांच्यावर आरोप करायचे, खरं तर काही कारण नाही. आता बघा हे सारे पुढारी समाजवादाच्या वचनाशी बद्धपरिकर आहेत. त्यासाठी त्यांनी जुन्या राजेरजवाडयांच्या हक्कांवर, तनख्यांवर गदा आणणारा वटहुकूम काढला. पूर्वी बील आणलं, पण ते पडलं, आता वटहुकूमही हायकोर्टानं फेटाळून लावला. ह्या जुन्या खोंडांना सामान्य जनांच्या मनातून उठवून लावण्याच्या बाबतीत घटना आडवी आली. तशी ती येणार हे बऱ्याच जणांना माहितही होतं. तेव्हा आता ह्या मंडळींचा तोरा उतरविण्यासाठी मंत्र्यांना, पुढाऱ्यांना, आर्थिक दृष्टया त्यांच्याएवढं नाही तरी त्यांच्यापेक्षा अधिक वरचढ होणं आवश्यकच होतं. त्यांना मंत्री, आमदार, खासदार, पुढारी म्हणून मिळणाऱ्या वेतनात हे शक्यच नव्हतं. म्हणून थोडी आडवाट स्वीकारली तर कुठे बिघडलं हो ? आणि समजा उद्या घटना मोडीत निघून, राजेरजवाडे उखडले गेले तर, समाजवादातून उत्कर्षाकडे वाटचाल करणाऱ्या जनतेला वैभवाकडे वाटचाल म्हणजे काय हे समजायला तरी 'वैभव' दिसलं पाहिजे नं ! राजेरजवाडे भूतकाळात जमा झाल्यावर, नवीन समाजाला वैभव दाखवण्याची जबाबदारी अर्थातच मंत्र्यावर, पुढाऱ्यांवरच नाही का पडत ! मग केवळ समाजवादासाठीच जर त्यांनी थोडया आडवाटा स्वीकारल्या, दहा-पंधरा वर्षांचे कर चुकवले तर एवढी आरडाओरड कशाला ? छे ! समाजवादी मधु लिमये, तुम्हाला खरा समाजवाद कळलेलाच नाही, हेच खरं !

□ □ □

बस-स्थानकावरून टिळकवाडीतल्या सदाशिवाच्या घरी जाण्यासाठी टांग्यात बसता बसता पुन्हा वत्सला आजीचे डोळे भरून आले. खेड्यातलं घर सोडून बसमध्ये बसल्यापासून मधूनच खोलवर अंतःकरणातून कसलीशी जीवघेणी वेदना उसळावी आणि तिनं डोळ्यातल्या अस्पष्ट आसवांच्या रूपानं प्रगट व्हावं असं कितीदा तरी घडलं होतं.

खरं तर त्या दिवशी सदाशिवाचं निर्वाणीचं पत्र आल्यापासूनच या श्रावण-झडीला सुरुवात झाली होती. सदाशिवानं त्या पत्रात लिहिलं होतं—

" इतके दिवस मी तुझं ऐकलं. पण आता मात्र मी तुझा हट्ट न चालू देता माझाच हट्ट पुरा करणार. शनिवारी संध्याकाळपर्यंत मी तिथं पोचत आहे. रविवारी आपणाला इकडे येण्यासाठी निघायचं आहे. तू तयारीत रहा, मी यावेळी तुझं काहीही ऐकणार नाही. सौ. चं बाळंतपण जवळ आलंय आणि या वेळी तुझी इथं फार जरूर आहे. "

ते पत्र वाचून आजी कावऱ्याबावऱ्या झाल्या होत्या. हे घर सोडून जाण्याची कल्पनाच त्यांना सहन होत नव्हती. गेल्या ४।५ वर्षांपासून चाललेल्या सदाशिवाच्या आग्रहाला न जुमानता त्या तिथंच त्या जुनाट, अंधाऱ्या घराला चिकटून होत्या. तिथल्या कणाकणात माधवरावांच्या स्मृती साठलेल्या होत्या. अंगणातला गुल-मोहर तर त्यांच्या संसारातील साऱ्याच सुखदुःखांचा साक्षीदार होता. त्यांच्या आयुष्याभोवती त्या गुलमोहरानं आपल्या लालभडक नाजूक फुलाची रांगोळीच रेखाटली होती. त्याच्याभोवती बांधलेल्या गोलाकार कट्ट्यावर बसून त्यांनी माधवरावांसोबत किती स्वप्ने रंगविली होती. किती स्वप्ने खरी ठरल्याचा आनंद भोगला होता, किती तुटलेल्या स्वप्नांची मळमळणारी वेदना त्या गुलमोहराच्या फुलात कुस्करली होती. त्यांच्या संसाराचा प्रारंभच मुळी त्या गुलमोहराच्या साक्षीनं झाला होता...

टांगा हालला तसा त्यांच्या मनातला आठवणींचा डोह हिंदकळल्यासारखा झाला. टांग्याच्या लयबद्ध हेलकाव्यांसोबत त्यांचं मन मागे मागे सरकत ५०–५५

---

**प्रा. पद्माकर दादेगावकर**

---

# गुलमोहर

वर्ष मागं गलं. त्यावेळी त्या ९–१० वर्षांची वच्छी होत्या, वत्सला आजीच्या डोळ्यासमोरून एक एक प्रसंग चित्रपटासारखा सरकू लागला.

त्या उन्हाळ्यात वच्छी आपल्या मामाकडे आली होती. दुपारी सगळ्यांचा डोळा लागल्याचे पाहताच ती बाहेर सटकली होती. रस्त्यानं फिरता फिरता एका एका घराच्या अंगणात डौलदारपणे उभा असलेला तो गुलमोहर तिला दिसला. त्याच्या अंगावर आलेला लालभडक बहर पाहता पाहता ती मोहरून गेली. आवारात शिरून ती झाडाजवळ जाऊ लागली तितक्यात आतून एक रागीट आवाज तिला ऐकू आला–

" ए पोट्टे, त्या झाडाला हात नको लावूस." आवाजापाठोपाठ एक १२–१३ वर्षांचा पोरगा धावतच बाहेर आला.

वच्छी जवळ येताच तो थबकला. त्याच्या मुद्रेवरील रागाची जागा विस्मयानं घेतली. क्षणभर तो काहीच बोलला नाही. वच्छी घाबरून मागे सरकत होती इतक्यात तो बोलला–



"फुलं पाहिजेत का तुला ?" मघाच्या रागीटपणाचा अंशही त्याच्या या प्रश्नात नव्हता हे पाहताच वच्छीला धीर आला. तिनं हलकेच मान डोलावली.

"बरं. घे. पण आधाश्यासारखी ओरबाडायची नाही."

ती दबकत दबकत झाडाजवळ गेली. सगळ्यात खाली वाटणाऱ्या फांदीला पकडण्याचा तिनं प्रयत्न केला. पण तिची उडी तिथपर्यंत पोचत नव्हती. तिनं मान वळवून मागे पाहिलं. तो मुलगा गालातल्या गालात हसत पुढे येत होता. क्षणभर वच्छीला भीती वाटली.

"असं कर, तू माझ्या खांद्यावर उभी राहून फांदी धर."

तिनं वेगानं मान झटकली. तिला एकाएकी लाज वाटली.

तिचे मान झटकणे पाहताच त्याच्या डोळ्यात रागाची छटा चमकल्याचा तिला भास झाला. त्यासरशी तिनं घाईघाईनं मान डोलावली.

मोठ्या मुश्किलीनं त्यानं तिला खांद्यावर पेलली. तिनं डहाळीला धरलं तेवढ्यात त्याचा प्रश्न भिरभिरत आला.

"तू माझी बायको होशील ?"

तिला मोठी गंमत वाटली. तिनं खाली वाकून त्याच्याकडे पाहिलं.

"शी !"

आई-मावशीच्या तोंडून ऐकलेल्या आपल्या काल्पनिक राजबिंड्या नवऱ्याचं चित्र तिच्या डोळ्यासमोर तरळलं. तिनं नकारार्थी मान हलविली.

"नाही ?" तो संतापला होता.

पण वच्छीच्या डोळ्यापुढे तिचा राजकुमार तिला घोड्यावर बसवून नेत होता.

"नाही ?"

तिनं नकारार्थी जोरदारपणे मान हलविली. दुसऱ्याच क्षणी आपल्या पाया-खालच्या आधाराला धक्का बसला आहे. त्यानं आपल्याला ढकलून दिलं आहे आणि हातात धरलेल्या डहाळीसकट आपण खाली पडत आहोत एवढंच तिला कळलं.

तिचा गुडघा दुखावला. टोकदार दगड लागून त्यातून रक्ताची धार लागली. तो मुलगा लांब लांब टांगा टाकीत घरात दिसेनासा झाला.

एकाएकी वच्छीला जाणवलं की तो शत्रूला ठार करून परतणाऱ्या आपल्या स्वप्नातल्या राकुमारासारखाच ऐटीत चालतोय्. ठिबकणारे रक्त विसरून ती त्याच्याकडेच पहात राहिली.

"मी तुझीच बायको होईन." ती नकळत पुटपुटली आणि हातातली गुलमोह-राची फांदी छातीशी धरून धावत सुटली.

खरेच ती त्याची बायको झाली. पहिल्याच भेटीत झालेली गुडघ्यावरची जखम व्रणाच्या रूपानं अद्यापही अस्तित्वात होती. त्यानं हळुवारपणे तिथे कुरवाळून

त्याचा मुका घेतला होता.

गुलमोहराभोवती त्यानं मग चांगला सिमेंटचा गोल कट्टा बांधून घेतला होता.

पहिला मुलगा व्हावा व तो त्यांच्यासारखाच असावा अशी तिची मनोमनची इच्छा होती. पण पहिली मुलगी झाली. आणि ती नाराज झाली.

"तुला आपल्या गुलमोहराची शपथ आहे. हास." त्यानं म्हटलं होतं आणि गुलमोहराची शपथ मोडण्याऐवजी तिनं मन मारून हसणं पत्करलं होतं.

आणि मग एखाद्या गोष्टीची शहानिशा करून घेण्यासाठी 'गुलमोहराची शपथ'च अस्तित्वात आली.

गुलमोहराची शपथ घालून तिनं त्यांच्यावर असलेल्या कर्जाची माहिती मिळविली होती आणि दोघांनी गुलमोहराच्याच साक्षीनं हिमतीनं ते कर्ज फेडायचं ठरवलं होतं, फेडलं होतं. दुसऱ्या बाळंतपणाच्या वेळी ऑपरेशनची पाळी आली होती, ऑपरेशन झालं होतं. ती मोठ्या शर्थीनंच बचावली होती आणि मूल मेलं होतं. तेही मुलगा! त्यानंतर ते उदास दिसू लागले होते आणि तिनं जंगजंग पछाडूनही ते आपल्या मनाचा थांग लागू देत नव्हते. शेवटी तिनं एक दिवस सोक्षमोक्ष लावायचाच या निश्चयानं त्यांना विचारलं होतं—

"तुम्हाला कशाची काळजी लागली हे जर आज तुम्ही सांगितलं नाहीतर मी गुलमोहराची शपथ घालीन."

"नको. नको." ते कळवळून म्हणाले होते.

"तुम्हाला गुलमोहराची शपथ आहे, सांगा."

ते अडखळले होते, भांबावले होते. त्यांनी आवंढे गिळले. पण शेवटी गुलमोहराची शपथ न मोडता त्यांनी तिला सांगितलं होतं—

"यापुढे तुला मूल होणं शक्य नाही असं डॉक्टरनं सांगितलं आहे."

तिच्या मस्तकावर वज्राघात झाला होता. काही दिवस बेचैनीत गेले आणि एक दिवस अनर्थ घडला. बैलगाडीतून नदी पार करताना गाडी उलटली होती आणि ते वाहून गेले होते. बैलांना हाकारण्यासाठी घरून निघताना घेतलेली गुलमोहराची फांदी ८–१० मैलावर सापडलेल्या त्यांच्या प्रेतानं तशीच घट्ट धरून ठेवलेली होती.

गुलमोहराला पाठीशी घेऊन त्यांनी मुलीला वाढवली होती. तिचं लग्न लावून दिलं होत. नातवंडं पाहिली होती आणि असाच अचानकपणे बाळंतपणातच आलेला एकुलत्या एका पोरीचा अपमृत्यूही पचविला होता. साऱ्या सुखदुःखांना त्यांनी गुलमोहराला साक्षी ठेवलं होतं. कितीदा तरी त्यांचे आनंदाश्रू, त्यांचे दुःखाश्रू यांचं स्नान त्यांनी त्या गुलमोहराला मुकाटपणे घातलं होतं.

त्यांचा नातू सदाशिव मोठा झाला, नोकरीला लागला, त्याचं लग्न आलं आणि नोकरी निमित्तानं तो वत्सला आजीच्या शहरात स्थायिक झाला, तशा साऱ्या जबाबदाऱ्या संपल्या होत्या. आता एक दिवस गुलमोहराच्या पायाशी देह ठेवायचा


एवढंच उरलं होतं.

पण संसार त्यांना सोडत नव्हता. सदाशिव त्यांना एकटीला राहू द्यायला तयार नव्हता. त्यांचं सारं मन त्या गुलमोहरात अडकलं आहे ह्याची त्याला जाणीव नव्हती. त्यांनी गुलमोहरापासून दूर व्हायचं टाळलं होतं. पण आता त्यांचा नाईलाज झाला होता. गुलमोहर हा त्यांचा भावनात्मक प्रश्न होता. त्यांना कुणाला उघडपणे सांगताही येत नव्हतं.

त्या शहरात माणसांना रहायला जागा नसेल मग झाडं कुठली असणार? त्यांचा अंतरात्मा आक्रोश करून उठला. पण सदाशिवची माया जड ठरली आणि आज त्या त्याच्याकडे आल्या होत्या.

टांग्याला हिसका बसून तो एकदम थांबला तशा वत्सला आजी भानावर आल्या. घरून निघताना त्यांनी गुलमोहराची एक छोटीशी डहाळी हातात आणली होती. ती दिवसभरात कोमेजून गेली होती. विषण्णपणे हसत सदाशिवने उतरण्यासाठी दिलेला आधार घेऊन वत्सला आजी खाली उतरली. तिची नजर सावकाश फिरत फाटकातून अंगणात गेली अन् ती चमकली. समोर एक तरणाबांड गुलमोहर आपलं सारं वासंतिक वैभव अंगावर मिरवत तिच्याकडेच पहात होता. तिच्या अंत:कर-णात हुंदका दाटून आला, तिनं ओलावल्या डोळ्यांनी सदाशिवकडे पाहिलं, त्याचे डोळे अभिमानानं हसत होते. 'आहे की नाही तुला नेमकं हवं ते इथं?' असंच जणू तो विचारत होता.

'सदाशिव' असा घोगरा आवाज काढून ती गुलमोहराच्या ओट्याकडे धावली, मध्येच अडखळली आणि पडली ती नेमकी गुलमोहराच्या पायाशी. हातातली सुक-लेली गुलमोहराची फांदी तिच्या निर्जीव पडलेल्या मुठीत मात्र तशीच होती.





# पर्ल हार्बर

लेखांक : दोन

विनय कुबेर

टोकियो शहरातील एका करड्या रंगाच्या भव्य इमारतीमध्ये जपानी नौदलाचे प्रशिक्षण विद्यालय होते. तिथे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये वार्षिक क्रीडामहोत्सव साजरा करण्यात येई. याप्रसंगी संभाव्य युद्धयोजनांची तालीम करून पाहिली जाई. जहाजांच्या लहान लहान प्रतिकृती वापरून नकाशावर युद्धाचे प्रात्यक्षिक केले जाई.

परिस्थितीच्या गांभीर्यामुळे या स्पर्धा सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यातच उरकून घेण्याचे निश्चित झाले. आरमाराचे वरिष्ठ सेनापती मंडळ पर्ल हार्बर मोहिमे-

बद्दल फारसे उत्सुक नव्हते. तरीही त्याने पहिल्या सागरी विमानदलाला या युद्धाची तालीम करून पाहण्याची परवानगी दिली.

कमांडर जेंडा मोठ्या उत्साहाने कामास लागला. पर्ल हार्बरला समुद्रमार्गे पोचण्यासाठी त्याने तीन वेगवेगळे मार्ग नियोजित केले. यापैकी पहिला मार्ग दक्षिणेकडून जात होता, दुसरा थेट जाणारा मध्यम मार्ग होता तर तिसरा उत्तरेकडून जात होता. तिसरा मार्ग जवळचा आणि बिनधोक होता. परंतु त्या मार्गावर हिवाळ्यात अत्यंत वाईट हवामानाला तोंड द्यावे लागणार होते. त्यामुळे नगुमोला तो पसंत नव्हता. परंतु जेंडाने त्याची समजूत काढली. हे वाईट हवामान जपानी आरमाराला फायद्याचेच ठरले असते. कारण त्यामुळेच 'पर्ल हार्बरवर उत्तरेकडून हल्ला होणे शक्य नाही' अशा समजुतीने अमेरिकन सैन्य गाफील राहणे संभाव्य होते. नगुमोने अखेर या मार्गाचा वापर तालमीसाठी करण्यास रुकार दिला.

परंतु हल्ल्याचे पहिले प्रात्यक्षिक जवळजवळ फसले! अमेरिकन सैन्याची भूमिका करणाऱ्या सैनिकांनी त्यांच्याकडून अपेक्षित असलेली सर्व प्रकारची संरक्षक योजना अमलात आणली. त्यांनी सूर्योदयाच्या सुमारास नगुमोच्या आरमाराचा छडा लावला. ओहूच्या नभांगणात जपानी विमानांना अमेरिकन विमानांशी निकराचा लढा द्यावा लागला. त्यांची अर्धीअधिक विमाने नष्ट झाली, दोन जपानी विमानवाहक नौकांना जलसमाधी मिळाली. अमेरिकनांच्या प्रतिहल्ल्यात इतर जपानी जहाजांचे प्रचंड नुकसान झाले असा निर्णय पंचांनी दिला!

हे सर्व प्रात्यक्षिक पुन्हा करण्यात आले. या खेपेस नगुमोची जहाजे अचूक वेळी पर्ल हार्बरनजीक पोचली. पहाटेच्या अंधुक प्रकाशात ती शत्रूच्या विमानांना दिसली नाहीत. जपानी आरमाराचे आगमन व स्थान तात्त्विकदृष्ट्या गुप्त राहिले. जपानी जहाजांना साधा ओरखडाही पोचला नाही. फक्त दोन विमानांची किंमत देऊन त्यांनी अमेरिकनांची भयंकर हानी केली अशी कबुली पंचांना द्यावी लागली. पहिल्या प्रात्यक्षिकाच्या अपयशामुळे हिरमुसलेल्या जेंडाचा चेहरा आनंदाने उजळला.

प्रात्यक्षिक यशस्वी होऊन सुद्धा बहुतेक सर्व उपस्थित अधिकाऱ्यांनी या प्रकारच्या मोहिमेस प्रखर विरोध केला. त्यांचे ध्यान संभाव्य दक्षिण मोहिमेवर केंद्रित झाले होते. या एका कारवाईतच जपानी आरमारावर असह्य ताण पडेल. त्यामुळे त्याला दक्षिणेकडील मोहिमेची जबाबदारी पेलणे अवघड जाईल असे त्यांना वाटत होते. विमानवाहकांसारख्या अल्प शस्त्रसंभार बाळगणाऱ्या जहाजांनिशी ही चढाई करणे धोक्याचे असल्याचे मत काही ॲडमिरल्सनी व्यक्त केले. त्यांना युद्धनौकांच्याबद्दलच्या प्रेमाने पछाडले होते!

सर्वच बलाढ्य राष्ट्रांच्या आरमाराधिकाऱ्यात युद्धनौकांच्या श्रेष्ठत्वाचे फॅड त्याकाळी मूळ धरून होते. त्याकाळच्या ब्रिटिश आरमारातील 'किंग जॉर्ज' व अमेरिकनांची 'साऊथ डाकोटा' या दोन्ही युद्धनौका ३५००० टनी होत्या.

युद्धाच्या अखेरीस दोस्तानी 'व्हंगार्ड,' 'मिसुरी' यासारख्या प्रचंड (४५००० टनी) युद्धनौका बांधल्या. जपानी आरमारातील यामामोटोची 'नगाटो' ही ध्वजनौका ३३००० टनी होती. त्याची पुढील क्षेप तर खूपच मोठी होती. जगात सर्वात भव्य ठरलेल्या 'मुसाशी' व 'यामाटो' या ६२००० टनी युद्धनौकांची बांधणी पर्ल हार्बर युद्धापूर्वीच सुरू झाली होती. या युद्धनौकांवर १८ इंच व्यासाचे तोफगोळे फेकणाऱ्या नऊ नऊ राक्षसी तोफा बसविण्याची योजना होती. जपानी आरमाराधिकाऱ्यांच्या युद्धतंत्रात युद्धनौकांना अजूनही अनन्यसाधारण महत्त्व होते या विधानाला त्यामुळे पुष्टी मिळते. १९४१–४२ मध्ये ही अवाढव्य जहाजे रोंरावत समुद्रसंचाराला प्रारंभ करणार होती. पुरातन युद्धतंत्राचा पाठपुरावा करणाऱ्या हट्टी अॅडमिरल्सना या जहाजांच्या सामर्थ्याचाच भरंवसा वाटत असावा! सागरी विमानदलाच्या युद्धक्षमतेवर अवलंबून राहण्याची त्यांची तयारी नव्हती ती यामुळेच!

सप्टेंबर मधील युद्धक्रीडास्पर्धांच्या प्रसंगी यामामोटोचे सर्व विरोधक संघटित झाले. पर्ल हार्बर योजना हाणून पाडण्याच्या उद्देशाने त्यांनी अनेक गुप्त सभातून खलबते केली. परंतु यामामोटोचा निर्धार अचल राहिला. याच सुमारास घेतलेल्या त्याच्या छायाचि त्रावरून केलेले त्याचे वर्णन या गोष्टीची साक्ष देते.

'अॅडमिरल यामामोटो सर्वसामान्य जपानी सैन्याधिकाऱ्यापेक्षाही बुटका दिसतो. त्याची उंची ५ फूट ३ इंचाहून जास्त नसावी. त्यांच्या रुंद अंगाखांद्यावर कित्येक लष्करी अधिकारदर्शक पट्टे रुळत आहेत. त्याच्या भव्य छातीवर असंख्य फिती व पदकांनी गर्दी केली आहे. एक चेहरा सोडल्यास त्याची आकृती एखाद्या बुजगावण्यासारखी वाटते. परंतु रुंद ओठ, सरळ धारदार नाक, मोठे डोळे व सैनिकी पद्धतीने ठेवलेले करडे केस असा त्याचा चेहरा पाहताच हा मनुष्य कर्तबगार व निश्चयी असला पाहिजे याबद्दल शंका उरत नाही.'

तारुण्यात यामामोटो अत्यंत अभ्यासू व परिश्रमी विद्यार्थी होता. अभ्यासाचा थकवा घालविण्यासाठी तो विचित्रच उपाय करी. हवेतील थंडी शरीरात भिनल्याने श्रमपरिहार होतो अशा कल्पनेने तो अभ्यासात गुंतलेला असता अंगावर अत्यावश्यक तेवढेच कपडे ठेवी. भर थंडीच्या दिवसातही तो स्वतःच्या खोलीत उघड्या नागड्या अवस्थेत, गणिताच्या पुस्तकात डोके खुपसून बसलेला आढळे!

## विरोधकांची माघार

नौदल अधिकाऱ्यांची पर्ल हार्बर योजनेविरुद्ध चालू असलेली कुरकूर यामामोटोच्या कानावर आली होती. म्हणूनच त्याने ऑक्टोबरमध्ये त्याच्या निवडक मदतनीसांची बैठक 'नगाटोवर' बोलाविली. 'युद्धव्यूहांवर विचारविनिमय करणे' हा बैठकीचा हेतू असल्याचे जाहीर करण्यात आले. सकाळी युद्धयोजनांचे शिक्षण व चर्चा झाली. नंतर सर्वांनी खमंग जेवणाचा समाचार घेतला. विश्रांतीनंतर

दुपारी सर्वजण जहाजाच्या मुख्य डेकवर गोळा झाले. या सभेतील वक्तव्यांची कागदपत्री नोंद केली जाणार नाही अशी सूचना प्रारंभी देण्यात आली. पर्ल हार्बर योजनेबद्दल सर्वांनी मोकळेपणाने मते मांडावीत असाच या सूचनेचा अप्रत्यक्ष अर्थ होता. प्रत्येक व्यक्ती या संधीची वाटच पाहत होती.

उत्तर पॅसिफीक महासागरातील लष्करी हालचाली थंडावल्या आहेत, त्यामुळे मौल्यवान् वेळ व्यर्थ चालला आहे. सागरातील खळबळ व वादळी हवामान यामुळे पर्ल हार्बरच्या प्रवासात उघड्या समुद्रात जहाजामध्ये इंधन तेल भरणे कठीण झाले आहे. या मोहिमेच्या नादी लागून पाठीमागे सोविएत रशियाच्या हालचालीं-कडे दुर्लक्ष होण्याचा धोका आहे. अशा अनेक तक्रारी करण्यात आल्या.

जानेवारीमध्ये या मोहिमेची आखणी करण्यात यामामोटोला मदत करणारा त्याचा मित्र ॲडमिरल ओनिशी सुद्धा उघडपणे त्याला विरोध करीत होता! जपानी आरमारातील मोजक्या विमानवाहक बोटींवर विसंबून ही मोहीम हाती घेण्यात घोडचूक होत आहे असे त्याने सांगितले. शेवटी नगुमोने बराच वेळ बोलून त्याच्या विरोधाची कारणे सांगितली. कदाचित आतापावेतो अमेरिकन आरमार सावध झालेले असेल. आपल्याला कोंडीत पकडून आपली दाणादाण उडविण्यासाठी ते मुद्दाम गाफीलपणाचे ढोंग करी असेल असा गंभीर इशारा त्याने दिला.

नगुमोच्या या मुद्यात खरोखरीच काही तथ्य होते. आंतरराष्ट्रीय राजकारण अत्यंत अनिश्चित व खळबळजनक बनले होते. त्यामुळे अमेरिकन नौदलाने पर्ल हार्बवरील आकस्मिक हल्ल्याला तोंड देण्याची पूर्वतयारी केलेली असणे शक्य होते. ही मोहीम यापूर्वीच काढावयास हवी होती. आता योग्य वेळ टळून गेली आहे. असा अनेकांचा सूर होता.

## ठाम निर्णय

मागे रेंगाळणाऱ्या चोरट्या सूर्यकिरणांमुळे क्षितिजावर आलेली लाली हळूहळू ओसरू लागली होती. ॲडमिरल यामामोटो या प्रकारणाचा सोक्षमोक्ष लावण्याच्या निश्चयाने बोलण्यास उभा राहिला. त्याच्या संथ व स्पष्ट वक्तव्यातून त्याचा निर्धार स्पष्ट होत होता. त्याने बहुतेक सर्व विरोधी मुद्दे खोडून काढले. नंतर तो म्हणाला, "या मोहिमेच्या विरोधाची कारणे मी पूर्णपणे जाणतो. परंतु आवश्यक ती काळजी घेऊन तिच्या यशासाठी झटणे हे आपले कर्तव्य आहे. ती रद्द करणे मला पसंत नाही. मी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा बराच काळ अभ्यास करीत आहे. जपानची दक्षिण दिग्विजयाची मोहीम यशस्वी होण्यासाठी आपल्या युद्ध-योजनात पर्ल हार्बरवरील चढाईचा समावेश करणे अत्यावश्यक आहे हे मी ठामपणे सांगू इच्छितो! मी स्वत: सेनापतिपदावर असेपर्यंत या चढाईचा पाठपुरावा करीत राहीन. त्यासाठी मी माझे अधिकारपद पणाला लावण्यासही कचरणार नाही!"

यामामोटोच्या स्पष्ट प्रतिपादनामुळे वातावरण एकदम बदलले. आपल्या कुर-

बुरीला यापुढे किंमत मिळणार नाही हे सर्वांना कळून चुकले. जपानने युद्धात उडी घेतल्यास सर्व आरमाराने उत्साहाने व एकजुटीने कामगिरीवर निघायला हवे असे चर्चेअंती ठरले.

यामामोटोला त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांचा विरोध मोडून काढणे सोपे गेले. परंतु नौसेनापती मंडळाचा अभेद्य बालेकिल्ला जिंकणे आता आवश्यक होते. यामामोटोने या शेवटच्या झगडयासाठी एक हुकमी अस्त्र राखून ठेवले होते. ऑक्टोबरअखेर त्याने हे प्रकरण तडीस नेण्याचे ठरविले. त्यासाठी त्याने कॅप्टन कुरोशिमा या हुशार अधिकाऱ्याची मदत घेतली. कुरोशिमाला त्याने स्वतःचे सर्व मुद्दे नीट पढवून तयार केले. सेनापती मंडळाशी वादविवाद करून पर्ल हार्बर मोहिमेला त्याचा होकार मिळवण्यासाठी त्याने कुरोशिमाजवळ त्याचे हुकमी अस्त्र देऊन ठेवले. अर्थात त्याचा उपयोग सर्वात शेवटी करायचा होता.

कुरोशिमा तडक कॅप्टन टोमिओका याचेकडे जाऊन थडकला. टोमिओका सेनापती मंडळाच्या कारवाई विभागाचा प्रमुख अधिकारी होता. कुरोशिमाने कसलेही सूतोवाच न करता थेट मुद्याला हात घातला. 'ॲडमिरल यामामोटोने मला पर्ल हार्बर मोहिमेबद्दल अखेरचा निर्णय आणण्यास पाठविले आहे. या मोहिमेला ताबडतोब होकार मिळावा अशी मागणी मी त्याच्यातर्फे करीत आहे.'

टोमिओकाने उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. ही योजना किती फसवी आणि धोकेबाज आहे हे कुरोशिमाला समजाविण्याचा त्याने प्रयत्न केला. परंतु कुरोशिमाने यामामोटोच्या शिकवणुकीनुसार त्याच्या सर्व मुद्यांचा निकाल लावला. तरीही कॅप्टन टोमिओकांच्या तोंडून होकार बाहेर पडेना. शेवटी कुरोशिमाने यामामोटोकडील हुकमी अस्त्र बाहेर काढले. त्याने टोमिओकाला सुनावले, 'या योजनेला नकार मिळाल्यास यामामोटो जपानी साम्राज्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेऊ शकत नाही. त्याला त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यासह राजीनामा देणे भाग पडेल!'

यामामोटोच्या या धमकीमुळे टोमिओका अवाक् झाला. हे त्याला अनपेक्षित होते. यामामोटोच्या कुशल नेतृत्वामुळे जपानी आरमाराचा प्रभाव वाढला होता. देशाची सुरक्षितता यामामोटोच्या नेतृत्वाखाली अभेद्य आहे असे सर्वांना वाटे. राष्ट्रयुद्धाच्या छायेत वावरत असता त्याने राजीनामा दिल्यास सर्व सैन्याचे नीतीधैर्य शाबूत राहणे अशक्य होते. टोमिओकाला यामामोटोच्या मागणीस संमती देण्यावाचून गत्यंतर उरले नाही. तरीही त्याने शेवटचा डाव टाकून पाहिला. पर्ल हार्बर मोहिमेला त्याने फक्त वैयक्तिक होकार दिला. सेनापती मंडळाच्या इतर सभासदांची संमती मिळविण्याचे काम त्याने कुरोशिमाकडेच सोपविले. कुरोशिमा डगमगला नाही. त्याने प्रत्येक ठिकाणी त्याच्या हुकमी एक्क्याचा वापर करून डाव जिंकला! सेनापती मंडळाने पर्ल हार्बर योजनेस एकमताने होकार दिला. यामामोटोच्या सर्वच विरोधकांचा बोजवारा उडाला!

## हेरगिरीच्या आघाडीवर

हवाई बेटातील जपानी हेरगिरीच्या कारवायांना आता जोराची चालना मिळाली. आतापर्यंत बंदरात अमेरिकनांची कोणती जहाजे आहेत यावरच त्यांचे लक्ष असे. यापुढे प्रत्येक जहाज नेहमी कोणत्या विशिष्ट धक्क्यावर उभे असते याची माहिती मिळविण्याचे हुकूम त्यांना देण्यात आले. वैमानिक टेहेळणीच्या योजना व विमानांची संरक्षण व्यवस्था याबद्दलची गुप्त माहिती मिळविण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले.

हे सर्व काम अत्यंत गुप्ततेत करावे लागे. त्यासाठी होनोलुलूमधील जपानी वकीलातीत काम करणाऱ्या व्यक्तींची काळजीपूर्वक निवड करण्यात आली होती. तादाशी मोरिमुरा हा तरुण कनिष्ठ अधिकारी या योजनेतील महत्त्वाचा घटक होता. त्याचे खरे नाव योशिकावा होते. पूर्वी तो जपानी नौदलात ध्वजरक्षक होता.

हवाईमधील जपानी राजनैतिक प्रतिनिधी या पदावर जनरल किटा या हुशार व्यक्तीची नियुक्ती नुकतीच झाली होती. योशिकावा त्याच्या आज्ञेत काम करणार होता. मार्च १९४१ मध्ये योशिकावाने हवाईत पाऊल ठेवले व ताबडतोब किटाची भेट घेतली. किटाने त्याच्या नव्या सहकाऱ्याचे उत्सुकतेने निरिक्षण केले. २९ वर्षे वयाचा असूनही योशिकावा तरणाबांड दिसत होता. त्याची शरीरयष्टी सडपातळ असून उंची मध्यमच होती. हा देखण्या चेहऱ्याचा पोरकट तरुण जपानचा प्रमुख हेर आहे हे कुणास सांगूनही पटले नसते !

योशिकावाचा स्वभाव भाबडा आणि सालस होता. त्यामुळे सर्व वयाच्या लोकात तो सहज मिसळू शकला असता. तरुण पोरींनी तर त्याच्याभोवती पिंगाच घातला असता. त्याला हेरगिरीचा थोडाही पूर्वानुभव नव्हता. शिवाय त्याच्या डाव्या हातात थोडे व्यंग होते. योशिकावा हेरगिरीत कितपत यशस्वी होईल याबद्दल किटा प्रथमदर्शनी साशंकच झाला.

परंतु टोकियोमधील चाणाक्ष हेरप्रमुखांची निवड चुकीची ठरणे शक्य नव्हते. योशिकावाचा नवखेपणा त्याच्या फायद्याचाच होता. वकीलातीच्या नोकरवर्गात त्याचे नाव यापूर्वी कधीच गोवले गेले नव्हते. शिवाय त्याला हेरगिरीस आवश्यक ते खास शिक्षणही दिलेले नव्हते. त्यामुळे अमेरिकन गुप्तहेरखात्याला त्याचा संशय येण्याची मुळीच शक्यता नव्हती.

योशिकावाचे पूर्वायुष्य अगदी सर्वसामान्य होते. तो एका पोलिसाचा मुलगा होता. नौसेनेच्या अकादमीत शिक्षण घेतल्यानंतर त्याने वर्षभर आरमारात ध्वज-रक्षकाचे काम केले. त्यानंतर त्याला दीर्घ आजारामुळे निवृत्त व्हावे लागले. परंतु खाऱ्या वाऱ्याची चटक त्याला स्वस्थ बसू देईना ! काही महिने अस्वस्थपणे भटकत काढल्यानंतर एका नौदल अधिकाऱ्याने त्याला पुन्हा नोकरी देण्याची तयारी दर्शविली. स्वतःच्या प्रिय नौदलात काम करावयास मिळावे यासाठी हेरगिरीचे जोख-

मीचे कामही त्याने स्वीकारले.

योशिकावाला त्याच्या कामगिरीबद्दलच्या सूचना फारच थोड्या वाक्यात देण्यात आल्या. त्याने स्वतःचे इंग्लिश भाषेचे ज्ञान प्रथम वाढवायचे होते. त्यानंतर त्याने अमेरिकन आरमार, त्याचे गुएम, पर्ल हार्बर व मॅनिला येथील तळ या सर्वांचा तज्ज्ञ जाणकार बनायचे होते. पुढील काही वर्षे त्याने अमेरिकन लेखक जेन याच्या 'लढाऊ नौका व विमाने' या पुस्तकात डोळे खुपसून घालविली. प्रत्येक अमेरिकन लढाऊ जहाज एकाच दृष्टिक्षेपात ओळखण्याइतकी त्याची तयारी झाली. त्यांची रचना व तांत्रिक वैशिष्टये त्याला तोंडपाठ झाली.

१९४० च्या अखेरीस त्याला परराष्ट्रखात्याची इंग्लिश भाषेची परीक्षा देण्याची सूचना देण्यात आली. हेरखात्याच्या प्रमुखाने त्याला परराष्ट्रखात्यातील कनिष्ठ अधिकाऱ्याच्या जागेवर नेमण्याचे ठरविले. त्यामुळे त्याच्या खऱ्या कामगिरीला आवश्यक ते संरक्षण मिळाले असते. एका लष्करी हेराचे मुलकी अधिकाऱ्यात रूपांतर करण्यात हेरखाते तरबेज होते. या 'मुलकी अधिकाऱ्या'ची परराष्ट्रातील जपानी कचेरीत नेमणूक केली जाई. तेथे त्याचे हेरगिरीचे काम निर्विघ्नपणे चालू राही. योशिकावा होनोलुलूमधील बड्या, रसिक अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मैत्रीसाठी हपापलेल्या, स्वच्छंदी, चैनी मनुष्याची भूमिका करणार होता.

अमेरिकन परराष्ट्रकचेरीत योशिकावाच्या नावाची नोंद जपानी वकीलातीतील कनिष्ठ अधिकारी म्हणून करण्यात आली. तरी त्याचे काम नावापुरतेच होते. तावडतोब तो मोठ्या तडफेने त्याच्या गुप्त कामाला लागला. शहरात प्रसिद्ध होणारी सर्व दैनिके तो अथपासून इतिपर्यंत वाचून काढी. अमेरिकन आरमाराचे अधिकारी ज्यात बहुसंख्येने सहभागी होत अशा सार्वजनिक समारंभाकडे त्याचे विशेष लक्ष असे. निरनिराळ्या लष्करी बोटींचे आगमन व प्रयाण तसेच त्यावरील युद्धसामुग्रीचा चढउतार दर्शविणाऱ्या बातम्या त्याच्या नजरेतून कधीच सुटत नसत. पर्ल शहरातून स्वैर भटकताना फोर्ड बेट व विमानतळाचे दर्शन त्याला रोजच होई. फोर्ड बेटासमोरील एका द्वीपकल्पावर पर्ल शहर वसले आहे. त्याच्या किनाऱ्याकडील भागात भरतीचे पाणी घुसू नये म्हणून एक भिंत बांधली होती. तीजवळच एका म्हाताऱ्या जपानी नागरिकाचे मद्यपानगृह होते. ही जागा पर्ल बंदराला सर्वात नजीकची होती. जेवणाच्या अगर मद्यपानाच्या निमित्ताने योशिकावा वरचेवर तेथे जाई. तेथून त्याला अमेरिकन आरमाराच्या हालचाली साध्या डोळ्यांनी निरखता येत. जहाजावर युद्धसामुग्रीचा साठा होत असल्यास, ते बंदराबाहेर जाण्याच्या तयारीत असल्यास योशिकावाला हमखास पत्ता लागे. रात्री तो अमेरिकन नौदलसैनिकांच्या आवडत्या बारमध्ये फेरफटका मारी. त्याच्या नोकरीसंबंधीच्या गप्पांकडे त्याचे कान लागलेले असत. परंतु त्यांना संशय येऊ नये यासाठी त्यांना स्पष्टपणे काही प्रश्न विचारणे मात्र तो कटाक्षाने टाळी.

अमेरिकन मुलकी हेरखात्याची (F. B. I.) आपल्यावर सावलीसारखी पाळत असू शकेल हे तो जाणून होता. किटाने त्याला या पाताळयंत्री संघटनेच्या हेरापासून सावध राहण्याची सक्त ताकीद दिली होती. योशिकावा ज्या ज्या हॉटेलात नेहमी जाई तेथे एखादा टेपरेकॉर्डर लपवून ठेवणे F. B. I. ला फार सोपे गेले असते. रात्री कचेरीतील सर्व नोकरवर्ग झोपी गेल्यावर योशिकावा किटाची भेट घेई. हेरगिरीत उपलब्ध झालेली गुप्त माहिती यावेळी तो किटाला देई. परंतु त्यांची चर्चा कागदावर लिहून चाले. शेवटी संभाषणातील सर्व चिटोरे दोघे पुरे जाळून टाकीत.

रिकामटेकडेपणाने टॅक्सीतून भटकायचे, रस्त्यात अनेक वेळा ती बदलायची असल्या तऱ्हेवाईक वागणुकीमुळे योशिकावा होनोलुलूमधील टॅक्सीचालकांचे आकर्षण बनला होता. त्याने स्वतःची मोटार ठेवण्याची कल्पना मात्र किटाने फेटाळून लावली. मोटारीच्या नंबरप्लेटमुळे त्याला ओळखून त्याचा पाठलाग करणे पोलिसांना सोपे गेले असते. एखाद्या अपघातापाठोपाठ तो पोलीस चौकशीच्या त्रासदायक कटकटीत गोवला गेला असता.

हवाईमधील हौशी प्रवाशांची वर्दळ ही योशिकावाला सुसंधी वाटे. तो बंदरात येणाऱ्या प्रत्येक जहाजावर जाई व त्यावरील उत्साही निरुपद्रवी जपानी प्रवाशाना आपणहून बेटांमधील प्रेक्षणीय स्थळांच्या सहलीस नेई. त्यामुळे त्याची एकाच ठराविक जागी वरचेवर उपस्थिती पोलिसांच्या डोळयावर येत नसे. अमेरिकेने जपानशी व्यापारावर बंदी घालेपर्यंत त्याचे हे उद्योग निर्धोकपणे सुरु होते.

एकदा तर त्याने कहरच केला ! हवाईमधील स्थानिक रहिवाश्याप्रमाणे भडक रंगीबेरंगी पोशाख चढवून त्याने एका गैशा मैत्रिणीसह हेलिकॉप्टरमधून ओहू बेटावरुन प्रेक्षणीय हवाई सफर केली ! यावेळी त्याला व्हीलर व हिकॅम वैमानिक तळांचे सूक्ष्म विहंगमावलोकन करण्याची संधी मिळाली. पट्टीचा जलतरणपटू, हौशी मासेमार अशी सोंगे घेऊन त्याने कित्येकदा या तळांची समुद्रातून अगदी जवळून पाहणी केली.

पर्ल बंदरासमोरील बेटामधील उसाच्या शेतातून बंदर व्यवस्थित दिसे. योशिकावा या शेतातून मजुराच्या वेषात भटकत राही. परंतु तो प्रत्येक वेळी नवीन शेताची निवड करी व कुठेही अर्ध्या तासाहून अधिक वेळ थांबत नसे.

उंचावरच्या पठारी भागातील एक विशिष्ट हॉटेल त्याचे अत्यंत आवडते होते. पर्ल बंदर व हिकॅम वैमानिक तळ यावर टेहेळणी करण्यासाठी हे एक उत्तम ठिकाण होते. अनेकवेळा तो या हॉटेलात जाऊन खूप दारु झोकल्याचे नाटक करी. मग त्याला सामील असलेला हॉटेलचा जपानी व्यवस्थापक त्याला तर्र अवस्थेत एका विशिष्ट खोलीत कोंडून ठेवी. खोलीचे दार बंद होताक्षणी योशिकावा सावरुन त्याच्या निरिक्षणाच्या कामगिरीस प्रारंभ करी. अशाच एका सकाळी बंदरातील

अमेरिकन आरमार बाहेर पडताना पाहून त्या हाडाच्या खलाश्याला अत्यानंद झाला. बंदराबाहेर निघतानाची जहाजांच्या हालचालींची पद्धत प्रत्येक जहाजाची ताफ्यातील ठरलेली जागा या गोष्टींचे त्याने घारीच्या तीक्ष्ण नजरेने निरिक्षण केले, सर्व आरमार बंदराबाहेर पडण्यास लागणारा वेळ अचूक मोजला. जपानी नौदलाला या माहितीची फार आवश्यकता होती. अमेरिकन जहाजांना उघड्या समुद्रात जपानी विमानांचा प्रतिकार करणे सोपे गेले असते. म्हणून हल्ल्याच्या प्रसंगी सर्व जहाजे बंदराबाहेर निसटण्यासाठी शर्थीचा प्रयत्न करतील हे निश्चित होते. प्रत्येक जहाजाची ताफ्यातील ठराविक जागा ठाऊक असल्यास जपानी विमानांना अशावेळी फार फायदा झाला असता. महत्त्वाच्या जहाजांचा अचूक निकाल लावण्यासाठी त्यांना पूर्वनियोजित योजना बनवून तिची तालीम करून पाहता आली असती. तसेच या कारवाईसाठी आवश्यक ते वेळेचे बंधनही निश्चित घालता आले असते. त्यामुळे त्यांची हल्ल्याची योजना जास्त लवचिक झाली असती.

ऑगस्टच्या प्रारंभी एके दिवशी व्हीलर वैमानिक तळ सार्वजनिक भेटीसाठी खुला ठेवण्यात आला. सर्वसामान्य जनतेचे व सैन्याचे संबंध जवळीकेचे रहावेत यासाठी अशी परवानगी देण्यात येई. योशिकावाने या पर्वणीचा फायदा घेतला नसता तरच नवल ! आतमध्ये कॅमेरा नेण्यास सक्त मनाई असली तरी त्यामुळे त्याचे काहीही अडले नाही. त्याने तळावरील सर्व महत्त्वाच्या गोष्टी पाहून त्या चांगल्या स्मरणात ठेवल्या व स्वतःच्या कचेरीत परतताक्षणी त्याची कागदावर नोंद केली.

योशिकावाचे कामाचे वेळापत्रक भरगच्च होते. त्यात सुटी अगर विश्रांतीला स्थान नव्हते. रविवारचा दिवस हा तर त्याच्या कामाचा मुख्य दिवस असे ! हवाईमध्ये जपानी हेरांची एक स्वतंत्र टोळी काम करत होती. परंतु तिच्या कामगिरीस योशिकावा फारशी किंमत देत नसे. ते लोक केवळ हौसेखातर गौण कामे करतात असे त्याला वाटे.

जपान लवकरच पर्ल हार्बरवर चढाई करील ही गोष्ट अमेरिकन नेते व लष्करी अधिकारी यांना स्पष्ट दिसत होती ! तरीसुद्धा जपानी हल्ल्याच्या वेळी हवाईतील अमेरिकन सैन्य बेसावध राहीले कसे ?

( क्रमशः )

(आधारित)

विज्ञानखबरी

दत्तप्रसाद दाभोळकर

## जेव्हा द्रौपदीला वस्त्रे मिळतात

शूर सेनापती भर रणांगणातून पळून जातो. आणि एखादा निष्ठावान सैनिक झुंजारपणे लढत राहतो. भलेमोठे पुढारी अगदी सहजपणे आपली टोपी बदलतात. गल्लीबोळातला एखादा व्रतस्थ कार्यकर्ता मात्र घेतलेला वसा टाकत नाही. शेवटी काळ फार मजेशीर असतो. भरसभेत दुर्योधनाच्या साळसूदपणाचेच वस्त्रहरण होते. आणि काही मूल्ये मनाशी जपणाऱ्या द्रौपदीला मात्र तिच्या अंतरीचा मुरारी नवी नवी वस्त्रे पुरवत राहतो.–भल्याभल्यांची खरी किंमत कळण्याचे हे असले प्रसंग विज्ञानक्षेत्रातही येतात.

गेल्या वर्षीची गोष्ट. एक साधी मजेशीर घटना. देवी शकुंतलादेवी, नामक एक गणिती बाई स्वत:च्या दैवी शक्तीचे प्रदर्शन करीत जगभर हिंडत होती. गणितातल्या अवघड प्रश्नांची तोंडी उत्तरे ती सहजपणे देत होती. ही गोष्ट कठीण होती. खूप बुद्धिमत्ता आणि मनाची विलक्षण एकाग्रता यासाठी आवश्यक होती. त्यासाठी बाईचे कौतुक होणे अगत्याचे होते. पण कार्यक्रमाच्या शेवटी बाई आणखी एक जादू करीत. भरसभेत कोणीही श्रोता त्यांना आपली जन्मतारीख सांगे जन्माच्या दिनांकावरून बाई तुमचा जन्मवार क्षणार्धात सांगत. खरे पाहता या कार्यक्रमातही असे काही फारसे नव्हते.–पण या कार्यक्रमाचा संबंध सरळ सरळ जोडला गेला दैवी शक्तीशी! पूर्वजन्मातल्या शुभ संचिताशी ! आपल्या अनेक राष्ट्रीय प्रयोगशाळेतून हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या शेवटी आमच्या अनेक मोठ्या शास्त्रज्ञांनी शेवटच्या कार्यक्रमातील दैवी शक्तीचा (Spiritual Power) आणि पूर्वजन्मांचा जाहीरपणे उल्लेख केला.–बाकी आपल्या मोठ्या शास्त्रज्ञांची गोष्ट सोडा. हे लोक श्रद्धायुक्त अंत:करणाने हटयोग्यांच्या प्रयोगाला हजर असतात. एखाद्या बाबांनी शून्यातून निर्माण केलेली स्विसमेड घड्याळे प्रसाद म्हणन ते हातात बांधतात ! पण अमेरिका आणि ब्रिटन मधले भलेभले शास्त्रज्ञही चक्क उघडे पडले. विज्ञान-क्षेत्रात दादा समजला जाणारा आयझॅक ॲसिमॉव म्हणाला, " हा दैवी शक्तीचा खेळ आहे. No normal person can do it ' जगप्रसिद्ध

लाइफ साप्ताहिकाने लिहिले, " A logical mathematical way to arrive at these calendar dates is so complex...that it is a spiritul power."

पण प्रश्न तुमच्या हुशारीचा आणि बुद्धिमतेचा नव्हता. तो होता तुमच्या मूलभूत निष्ठांचा! जगभरच्या काही विज्ञाननिष्ठ तरुणांनी हे सारे मान्य करण्याचे साफ नाकारले. बंगालचा समर गुहा. आंध्रचा रंगाराव, अमेरिकेतला थॉमस ओबेनॉन यांनी तर जाहीरपणे या बुवाबाजीविरुद्ध आवाज उठविला. त्या तरुणांचे म्हणणे साधे होते. 'पूर्वजन्मातल्या स्मृती असतात हे एकवेळ मान्य केले. तरीही, या शतकातले कॅलेंडर अचूकपणे पाठ असण्याचे काही कारण नाही. म्हणजे पूर्वजन्मी हे कॅलेंडर पाठ करून ठेवले व या जन्मात वापरले असला प्रकार. पुन्हा कॅलेंडर का पाठ केले? ते पाठ करणे शक्य आहे का? असले साधे प्रश्न आलेच.– या सर्वाला एक साधे उत्तर असे. कोणत्यातरी सोप्या कोष्टकानुसार हे सारे जमले पाहिजे.' पण मजा पाहा. हे तरुणच खोटे पडले. या तरुणांचे म्हणणे मान्य करावयाचे असेल तर ते सोपे कोष्टक त्या तरुणांनीच दिले पाहिजे म्हणून 'सायन्स डायजेस्ट' सारख्या विज्ञाननिष्ठ मासिकांनी सांगितले. पण वाईटातूनही कधी कधी चांगले निघते. ते तरुणही हट्टाला पेटले. चार महिन्यापूर्वी थॉमस ओबेनॉनने जन्मतारखेचे छोटे सोपे कोष्टक सादर केले आहे. भल्याभल्यांचे पितळ उघडे पडले आहे. आणि इकडे द्रौपदीची निष्ठा उजळून निघाली आहे. हे साधे कोष्टक प्रयत्नपूर्वक लक्षात ठेऊन थोडा सराव करणारा कोणीही मुलगा आता गणपती उत्सवात हा 'दैवी प्रयोग' करून दाखवेल.

प्रथम प्रत्येक महिन्यासाठी थॉमस ओबेनॉनने दिलेले जादा आकडे लक्षात ठेवा.

| | | | |
|---|---|---|---|
| जानेवारी – ० | एप्रिल – ० | जुलै – ० | ऑक्टोबर – १ |
| फेब्रुवारी – ३ | मे – २ | ऑगस्ट – ३ | नोव्हेंबर – ४ |
| मार्च – ४ | जून – ५ | सप्टेंबर – ६ | डिसेंबर – ६ |

आता समजा तुम्हाला एप्रिल १५, १९२० या दिवसाचा वार शोधावयाचा आहे.

प्रथम जन्माची तारीख मांडा व त्यात महिन्याचा जादा आकडा मिळवा. नंतर जन्मवर्षातील शेवटच्या दोन आकड्यांना दोनने भागून तो आकडा पहिल्या आकड्यातून वजा करा. असे गांगरू नका. हे फार सोपे आहे.

आपली तारीख आहे एप्रिल १५, १९२०.

| | | |
|---|---|---|
| तारीख + महिन्याचा जादा आकडा | = | १५ |
| वर्षातील शेवटचे दोन आकडे, भागीले दोन | = | १० |
| वजाबाकी | | ५ |

आता प्रत्येक आठवड्याची सुरुवात रविवार पासून होते. रविवार पासूनचा पाचवा दिवस. म्हणजे १५ एप्रिल १९२० हा दिवस गुरुवार आहे.

२. आता आपण आणखी थोडे कठीण उदाहरण घेऊ. समजा पहिल्या आकड्यापेक्षा दुसरा आकडा मोठा आहे. वजाबाकी होणे काही शक्य नाही. अशावेळी वरच्या आकड्यात सात वा सातच्या पाढ्यातील कोणताही आकडा मिळवून तो आकडा खालच्या आकड्याहून मोठा करा. येणारी वजाबाकी सातपेक्षा मोठी असेल तर त्याला सातचा भाग देऊन बाकी उरणारे आकडे विचारात घ्या.

समजा आपणाला सात डिसेंबर १९४० या दिवसाचा वार पाहिजे आहे,

तारीख अधिक महिन्याचा जादा आकडा = ७ + ६ = १३

वर्षातील शेवटचे दोन आकडे भागिले दोन = ४०/२ = २०

आता वरील आकडा खालील आकड्याहून मोठा करण्यासाठी आपण त्यात ७ × २ = १४ हा आकडा मिळवू.

म्हणजे १४ + १३ = २७

− २०

७

म्हणजे रविवार पासूनचा सातवा दिवस म्हणजेच शनिवार.

३. वरील दोन्ही उदाहरणात आपण लीप वर्षे (जादा वर्षे) विचारात घेतलेली आहेत. समजा आपणाला ७ डिसेंबर १९४१ या दिवसाचा वार पाहिजे आहे. अशावेळी त्या वर्षाच्या आधी आलेल्या लीप वर्षासाठी येणारा वार शोधून काढा व त्यानंतर आपल्या वर्षातील व लीप वर्षातील अंतराचे आकडे त्यात मिळवून वार सांगा.

म्हणजे सात डिसेंबर १९४० हा दिवस शनिवार आहे हे आपण पाहिले आहे. सात डिसेंबर १९४१ हा दिवस एक आकड्याने पुढे गेला असेल. म्हणजे तो वार रविवार असेल. सात डिसेंबर १९४२ हा दिवस शनिवारपेक्षा दोन आकड्याने पुढे गेल्याने सोमवार असेल.

४. आता एक शेवटचा सोपा नियम लक्षात ठेवा. समजा अधिक वर्ष नसलेल्या सालातील जानेवारी वा फेब्रुवारी महिन्यातील वार तुम्ही शोधत आहात. अशावेळी आलेल्या वारात तुम्ही आणखी एक हातचा वार मिळविला पाहिजे. अधिक वर्षातील फेब्रुवारी महिन्यातील एकोणतीसावा दिवस विचारात घेण्यासाठी हे जरूरीचे आहे.

समजा जानेवारी २१, १९४१ या दिवसाचा वार तुम्ही शोधत आहात. प्रथम आपण २१ जानेवारी १९४० या दिवसाचा वार शोधला. तो रविवार आहे. म्हणजे २१ जानेवारी १९४१ सोमवार हवा. पण नियम क्रमांक चार प्रमाणे

आपण त्यात आणखी एक वार मिळवितो. म्हणजे जानेवारी २१, १९४१ हा दिवस आहे मंगळवार.

—बस्स ! सारे नियम आहेत एवढेच. फार थोड्या सरावाने तुम्ही अगदी मजेत कोणत्याही मित्राचा जन्मवार जलद गतीने अचूक सांगू शकाल. विसाव्या शतकातील कोणत्याही तारखेसाठी हे कोष्टक उपयोगी आहे. या कोष्टकात फार थोडा बदल करून एकोणिसाव्या वा एकविसाव्या शतकातील तारखेचे वारही तुम्ही ओळखू शकाल. हे कोष्टकात बदल करण्याचे काम तुम्हीसुद्धा करू शकाल.

—पण भाई थॉमस ओबेनॉन म्हणतो, " असले काही करू नका. उगाच आपला वेळेचा अपव्यय ! त्यापेक्षा विज्ञानातील नवी नवी आव्हाने स्वीकारा आणि दमदारपणे पुढे व्हा. संतती नियमनाला विरोध करणाऱ्या पोकळ्या विज्ञानातले कच्चे दुवे दाखवून द्या. गोहत्याबंदीची मागणी कशी अशास्त्रीय आहे हे आणखी कोणाला पटवून द्या. हातातून घड्याळे निर्माण करणाऱ्यांचे प्रयोग हे सारे जादूचे प्रयोग आहेत हे त्यांच्या भगतगणांच्या गळी उतरवा. जत्रेत पेटत्या निखाऱ्यावरून चालणे आणि मलंगासमोरचे दगड हवेत तरंगवणे हे साधे सोपे वैज्ञानिक प्रयोग आहेत हे त्या

## अधिक आणि उणे

बेरीज आणि वजाबाकी दाखविण्यासाठी जगभर + आणि − ही चिन्हे उपयोगात येतात. ही चिन्हे प्रथम कुणी आणि केव्हा उपयोगात आणली हे तसे अज्ञातच आहे. या चिन्हांच्या जन्माबाबत अनेक तर्क करण्यात येतात. इ. स. पूर्वी १५५० या काळी इजिप्शियन गणितज्ञ हेमेस यांने सर्वप्रथम अधिक आणि उणे या शब्दांसाठी चिन्हे वापरली. मात्र त्याने वापरलेली चिन्हे अधिक (u) व उणे (u) अशी होती. भारतीय गणितज्ञ ब्रह्मगुप्त आणि भास्कर यांनी प्रथम + हे चिन्ह वापरले. मात्र ते चिन्ह आकड्यांच्या शेवटी वापरले जाई व त्याचा अर्थ वजाबाकी असा होता ! जसे.

१३, ६ + ∴ १३−६ = ७.

संस्कृतमधील ऋण या शब्दातील फक्त पहिले अक्षर ऋ हे कर्ज दाखविण्यासाठी काही काळ गणितज्ञ वापरत. त्या अक्षरावरून वजाबाकी = ऋ = + असे चिन्ह बनले असावे. मात्र त्या चिन्हाचा अर्थ कसा फिरला हे मात्र माहीत नाही. डच गणितज्ञ व्हॅन्डरहूक याने १६ व्या शतकात अधिक शब्दासाठी + हे चिन्ह वापरलेले आहे. उणे (मायनस) या शब्दासाठी इंग्लंडमध्ये काही काळ m हे अक्षर वापरत आणि युनिकल शब्दपद्धतीप्रमाणे m हे अक्षर ÷ या चिन्हाने दाखवीत. त्याचाच अपभ्रंश होऊन पुढे फक्त − हे चिन्ह उरले असते.

ठिकाणी जाऊन दाखवून द्या. आजचा काळ मोठा कठीण आहे. तुमचे विज्ञानावर प्रेम आहे. विज्ञानानेच माणसाला चंद्रावर पोचवलंय. पण कधी नव्हे ती आज विज्ञानालाच तुमच्या मदतीची जरूरी आहे. भले भले लोक विज्ञानाचे वस्त्रहरण करायला आज टपून बसलेत! विज्ञानाचे असे क्षणभर वस्त्रहरण झाले तर मानवी संस्कृतीवर फार मोठी आपत्ती कोसळणार आहे! तेव्हा, तुम्ही कोठल्या गल्लीबोळात उभे आहात हे महत्त्वाचे नाही. जिथे कुठे असे वस्त्रहरणाचे प्रसंग दिसतील तिथे भगवंताच्या निष्ठेने पुढे व्हा....विज्ञानाला वस्त्रे पुरवा "-भाई थॉमस ओबेनॉनचे हे म्हणणे मला पटले आहे. विज्ञानेश्वरीच्या तरुण वाचकांनाही ते पटेल असा माझा विश्वास आहे. ◻

## दूरचे तारे । लेखांक सात

**श्रीकांत आंबेकर**

# प्रतिद्रव्य (Anti-Matter)

नव्या प्रकारच्या अग्निबाण इंधनाच्या शोधाच्यामागे लागणाऱ्यांपैकी एका अत्युत्साही गृहस्थाचे नाव आहे ब्रुनो एम्. पोण्टेकोर्व्हो! सोविएत रशियाच्या सायन्स अकादमीचे ते एक मानकरी असून न्यूट्रीनो आणि ऋणाणुक व मेसनशी साम्य असलेल्या गूढ अशा कणांचा शोध लावणाऱ्यांपैकी ते एक आहेत. या पोण्टेकोर्व्होंच्या म्हणण्यानुसार न्यूट्रीनोज् आणि अँटी-न्यूट्रीनोज् हे भावी काळात भेटणाऱ्या, सापडणाऱ्या एका नव्या, गूढ जगाचे दूतच आहेत.

'प्रतिद्रव्य' या कधी कुणी स्वप्नातही न कल्पिलेल्या, एका रम्य सत्यकथेची सुरुवात झाली ती पॉझिट्रॉनच्या शोधापासून! पॉझिट्रॉन म्हणजे धनविद्युतभारित ऋणाणुक अर्थातच प्रति-ऋणाणुक होय. या शोधापासून एका नव्याच दिशेने प्रगतीची पावले पडायला लागली. लवकरच प्रतिधनाणुक व प्रति-न्यूट्रॉन्सही परिचित झाले. यापासून 'प्रति-परमाणु' कल्पना साकार झाली. प्रतिद्रव्य अस्तित्वात आले.

द्रव्याच्या परमाणूंच्या उलट रचना प्रतिद्रव्य-परमाणुत असते. आपल्या साध्या द्रव्य-परमाणुत एक वस्तुमान लाभलेले धनविद्युतभारित कण केंद्रस्थानी एकवटलेले असतात. दुर्लक्षणीय वस्तुमानाचे ऋणविद्युतभारित कण या केंद्राभोवती काही विविक्षित कक्षांमधून फेऱ्या मारीत असतात. याउलट प्रतिद्रव्य-परमाणुत एक वस्तु-

मान ऋणविद्युतभारित कणांनी बळकावलेले असून ते केंद्रस्थानी बस्तान ठेवून असतात. दुर्लक्षणीय वस्तुमानाचे धनविद्युतभारित कण प्रदक्षिणा घालण्याच्या कामात मग्न असतात. असे असले तरी अखेरीस, प्रतिद्रव्य परमाणुतही, वस्तुमान केंद्रस्थानीच एकवटलेले असून परमाणु बाह्यतः विद्युतभाररहित वा न्यूट्रलच असल्याने प्रतिद्रव्य द्रव्यापासून वेगळे ओळखता येणेही अशक्यच आहे.

प्रतिद्रव्य तर सापडले, पण त्याचे विपुल अस्तित्व कुठे असेल ही समस्याच होती. पृथ्वीवर त्याचे विपुल अस्तित्व असणे अशक्यच! आपल्या उपविश्वातदेखील अगदी १०,०००,००० साध्या द्रव्यकणात एखादा प्रतिद्रव्य कण असेल हा शास्त्रज्ञांचा अंदाज! हे अस्तित्वात असलेले प्रतिद्रव्य इतस्ततः विखुरलेलेच आहे. 'द्रव्यकणांची नजर चुकवून, प्रतिद्रव्य कणांनी एक होऊन नवीनच तारा निर्माण करायला घेतला आहे' अशा प्रकारचे वृत्त अजून तरी कुठेही प्रसिद्ध झालेले नाही. तात्पर्य, आपल्या उपविश्वात एकही प्रतिद्रव्यीय तारा नाही. मग एकत्रितपणे हे प्रतिद्रव्य मिळवायचे तरी कुठे?

......सन १९३१. वसंत ऋतूचा प्रसन्न काळ. एके दिवशी सर्वत्र मोठी खळबळ उडाली. जगातील झाडून साऱ्या वृत्तपत्रांनी ती बातमी प्रसिद्ध केली. बातमी ही अशी–चांगलीच सनसनाटी : 'मानवाने प्रथम अंतरिक्षातून येणारे रेडिओ संदेश अचूकपणे टिपले.' झालं! या बातमीचा धागा पकडून, मंगळावर व शुक्रावर सजीव सृष्टी आहे असे मानणाऱ्या मंडळींनी पुन्हा एकवार उचल खाल्ली. दुर्दैवाने लवकरच त्यांच्या उत्साहातील हवा निघून गेली. असे सिद्ध झाले की, अशा प्रकारे संदेश पाठविणारी रेडिओ केंद्रे नैसर्गिकच आहेत. कुणीही बांधलेली नाहीत.

हे अंतराळसंदेश टिपणाऱ्या पहिल्या मानवाचे नाव काय यासंबंधी उत्सुकता वाटतच असेल. तो एक अमेरिकन शास्त्रज्ञ होता. त्याचे नाव कार्ल जान्स्की! त्याच्या या शोधापाठोपाठ मोठ्या दुर्बिणींच्या जोडीला भल्या प्रचंड अँटेना आल्या. त्यांनी संशोधनाचे काम सुकर तर केलेच, शिवाय संशोधनाचे क्षेत्रही वाढविले. या अँटेनानाच पुढे करून, मग शास्त्रज्ञांनी प्रतिद्रव्याच्या शोधार्थ दूरच्या उपविश्वांचे दरवाजे ठोठवायला सुरुवात केली...अचानक प्रतिसादही मिळाला......

...प्रतिसाद देणाऱ्या पहिल्या उपविश्वाचे नाव आहे मेसियर–८७! याच्यापासून येणाऱ्या विलक्षण शक्तिशाली रेडिओ संदेशानी प्रथम काही काळ तज्ञांना बुचकळ्यात टाकले. इतक्या शक्तिशाली रेडिओलहरींची निर्मिती कोणत्या विचित्र नैसर्गिक परिस्थितीतून होत असावी हे चटकन लक्षात येईना.. अन् मग एकाएकी ...सापडले! उत्तर सापडले!! शास्त्रज्ञांना असा जबरदस्त संशयच आला की प्रतिद्रव्य आणि द्रव्य यांच्या संघर्षातूनच या शक्तिमान रेडिओलहरी उत्पन्न होत असाव्यात. गृहीत सापडले. त्यावरून निष्कर्ष काढले गेले. प्रत्यक्ष निरिक्षणातून मिळालेल्या निष्कर्षांशी ते जुळत होते. झाले! मेसियर–८७ मधील प्रतिद्रव्याचे ठळक

प्रमाण निश्चित झाले. त्यानंतर कॅसिओपिया–ए आणि सिग्नस–ए या रेडिओलहरींच्या शक्तिशाली उगमस्थानांनीदेखील आपल्याजवळ प्रतिद्रव्य असल्याचे गुपित फोडले.

या रेडिओ केंद्रांविषयी मोठी मनोरंजक माहिती उपलब्ध झालेली आहे. ती सांगायलाच हवी. मेसियर–८७ हे तसं एक साधंच उपविश्व होते. त्याच्याकडे कुणाचंही लक्ष वेधले जाण्याचा सुतराम संभव नव्हता. पण मध्येच त्याला एकाएकी एक हात फुटला अन् त्याला असामान्यत्व लाभले. शक्तिशाली रेडिओ संदेश पाठविण्यात याच हाताचा प्रामुख्याने हात आहे. शास्त्रज्ञांचा मात्र याबाबत असा दावा आहे की हा हात मेसियर–८७ चा नाहीच आहे मुळी मुळात ! मेसियर–८७ हे साधे आपल्यासारख्याच द्रव्याने भरलेले उपविश्व. पण जाता जाता त्याने एका प्रतिद्रव्य–उपविश्वाचा एक भला थोरला लचका तोडला. तोच त्याचा हा हात ! या हातात सध्या द्रव्य–प्रतिद्रव्याचा जो विनाश चालू आहे त्यामुळेच विलक्षण शक्तिशाली रेडिओलहरी निर्माण होत आहेत.

याहूनही अधिक धैर्याने खगोलशास्त्रज्ञ सिग्नस–ए बद्दल बोलतात. ते म्हणतात, ‘ सिग्नस–ए ’ हे रेडिओ केंद्र म्हणजे केवळ एकच उपविश्व नाही आहे. सामान्य द्रव्याबरोबरच प्रतिद्रव्यही पुरेशा प्रमाणात धारण करणाऱ्या दोन उपविश्वांचा जोरदार संघर्ष तेथे चालू आहे. परिणाम–विलक्षण शक्तिशाली रेडिओलहरींची निर्मिती ! ’ एकूण भलतेच रोमहर्षक पर्व सिग्नस–ए च्या आयुष्यात घडते आहे. जास्त अचूक बोलायचे तर तब्बल २७० दशलक्ष वर्षांपूर्वी ते चालू होते. कारण सिग्नस–ए आपल्यापासून २७० दशलक्ष प्रकाशवर्षे दूर आहे. आज काय घडते आहे ते अर्थातच अज्ञात आहे. ज्ञात होईल आणखी २७० दशलक्ष वर्षांनंतर !

खगोलशास्त्रातून डोके बाहेर काढून पुनश्च आपल्या विषयाकडे वळायचे म्हटले तर असे सांगता येईल की, आजकाल काही तज्ज्ञांच्या डोक्यात प्रतिद्रव्याचा वापर इंधन म्हणून करायचे विचार घोळत आहेत. या विचाराचे आश्चर्यच वाटेल कुणालाही ! तसे पहायला गेले तर त्यांच्या अगदी हाताशी–किरणोत्सर्गी मूलद्रव्ये आहेत ती सारी आइनस्टाइनच्या $E = MC^2$ या सूत्राची काटेकोरपणे अंमलबजावणी करत प्रचंड शक्ती मुक्त करताहेत. असं असताना मिळावयासही कठीण असणाऱ्या या प्रतिद्रव्याचा ध्यास तज्ज्ञांनी का घ्यावा ? त्याला अर्थातच कारण आहे. प्रतिद्रव्याच्या अंगात त्या सूत्राला टांग मारायचे सामर्थ्य आहे हे त्यांनी केव्हाच ओळखले आहे. द्रव्य आणि प्रतिद्रव्य यांच्या संघर्षातून निर्माण होणारी शक्ती $M C^2$ प्रणित शक्तिहून दुपटीने अधिक असेल हे प्रयोगशाळातून सिद्ध झालेले सत्य त्यांना ठाऊक आहे. एक धनाणुक व प्रति–धनाणुक यांचा संघर्ष घडून आला असता, दोन्हीही कणांचा संपूर्ण विनाश घडून येऊन $१.८ \times १०^{१२}$ इलेक्ट्रॉन व्होल्टस् किंवा ३.६ अर्ग एवढी शक्ती मुक्त होईल असा शास्त्रज्ञांचा दावा आहे अन् हेच खरं

पृष्ठ ४८ वर

# ब्रह्मी लोकनृत्यात हरवलेली संध्याकाळ

सौ. मंदाकिनी गोगटे

प्रकाशाचे मऊ लोट रंगमंच उजळतात, तेव्हा दृष्टीला प्रथम पडतात सोन्याच्या नक्षीदार कोंदणात बसवलेली भव्य अशी पाच वाद्ये. त्या कोंदणावर दोन सुवर्णअश्व असे उभे की आपल्या श्रीमंतीची शान दाखवणारे. ही दरबारी भव्य वाद्ये बहुदा पॅगोडामध्येच वाजवली–जात असणार. नाहीतर इतकी आकर्षक, इतकी सुंदर वाद्ये एरवी कुठली हाताळायला मिळणार? वाटतं त्या वादकांची नजर चुकवून हळूच सरगम वाजवून यावं. स्वरांचा झंकार ऐकावा.

पडदा उघडतो नि एक आरस्पानी सौंदर्य दिसतं. त्या शुभ्रवसनेच्या पायापासून लांबवर जो घोळ पसरलेला आहे ना त्याचं नाव हॅटॅमिन. नाव जरा कर्कशच वाटतं नाही? पण दिसतं मात्र फार छान. अगदी दरबारी थाटाला शोभणारं. डोक्यावर, हेअरडूच्या मोठ्या अंबाड्यातून पुढे आलेला मुलायम केसांचा काळा झुपका नि खाली हा अलगद पसरलो शुभ्र घोळ. दोन्हीही एकमेकांना सुसंगत. हे सारं एका क्षणात समजून घ्यायचं. आता ती शुभ्रवसना कमनीय आहे नि अलंकृतही आहे, म्हणजेच एक स्वप्न. तशात, ते सौंदर्य पहाटेसारखं सौम्य, धवल, उज्वल नि हसरं

आहे. त्या स्वप्नाला गती आहे. ते स्वप्न हावभावासहित अलगद उठतं नि त्यात आणखीनच चापल्य येतं. शरीराचे कमनीय हेलकावे नि हातांच्या तांबूस नाजूक तळव्यांच्या अशा हालचाली की कोमल फुलंच पटपट उमलताहेत. हे सारं पाहताना स्वप्ननगरीत गुंगून गेल्याचा भास होतो. अशीच एक संध्याकाळ. स्वतःचं आस्तित्व हरवून बसलेली नि भूपाळीच्या जवळपासच्या सूरांवर अलगद उतरणारं ते पहाटेचं स्वप्न ! आणि तो मंद प्रकाश ! तो प्रकाश मुळी प्रकाश रहातच नाही. ते होतं श्रावणातलं सकाळचं कोवळं उन.

## मृगया

तीन सोनेरी हरणं. दुडदुडणारी. हसत खेळत आविर्भाव करत इकडून तिकडे जाणारी. मृग म्हणजेच चापल्य. म्हणूनच त्या साऱ्या आविर्भावांना, हातांच्या कमनीय हेलकाव्यांना आलेलं चापल्य. सुवर्णायुध घेऊन आलेले जरतारी पोषाखातले तीन राजपुत्र. एक लाल पोषाखातला, एक निळ्या, नि तिसरा जांभळा सुरांची लय साधत मृगाला शोधणारं त्यांचं नृत्य. राजपुत्रांचं हरणांपाठी वेगवेगळं जाणं, हरणांचं सटकणं, निसटून जाण्याच्या त्या हालचाली सारंच आगळं. मग पराभूत असे ते राजपुत्र एकत्रित होऊन मृगया करू लागतात. लाल, निळा नि जांभळा रंग नि त्या तीन मृगांचा सोनेरी पिवळा रंग एकत्रित गुंफले जातात. दुडदुडत्या हरणांचे व राजपुत्रांचे एकत्रित आविर्भाव, कमनीय अंगविक्षेप; एकाच लयीत, एकाच ठेक्यात केलेलं ते चपल नृत्य. सारंच विलोभनीय. रंग आणि नृत्य दोन्हीही एकमेकांना उठाव आणणारे. कोणतं चांगलं कोणतं वेगळं तेच न उमगणारं. एकमेकात सगळं मिसळून गेलेलं.

गोधूलीची वेळ. गुलाबी असा संध्याप्रकाश. एक, दोन – बघता बघता सहा कमनीय स्त्रिया कमरेवर घडे घेऊन लपकत, मुरकत; मुलायम हातांच्या लयदार हालचाली करत अलगद येत आहेत. पाणी भरताहेत. घट भरल्यावर घरी जायला पावलं वळताहेत. त्यातली एक राधा. वेडी खुळी. मुरलीच्या सुराने बावरी झालेली. धुंद बनलेली. साऱ्या आपापल्या घरी जाताना तिला हसताहेत, खिजवताहेत. पण हिला कुठलं भान ? ही त्या मुरलीतच मग्न. मग पैंजणे येणं, काटा काढणं, सारंच भारतीय वाटणारं.

तीन प्रेमातूर युगुलं. यौवनानं भारलेली. तीन युवक आपल्या प्रेयसींकरता वेडेखुळे झालेले. त्याही तशाच धुंद. एकमेकांना खूष करण्याकरता वाद्यांची लय साधत केलेले निरनिराळे आविर्भाव, कमनीय अंगविक्षेप, निरनिराळ्या प्रकारे त्या आविर्भावातून, विलोल हालचालीतून प्रगट होणारी आर्जवं आणि आसक्ती. मग एकमेकांनी घातलेली साद. मध्येच एकदम जाणवतं की जणू एखादा पक्षीच आपले पंख फडफडावत आपल्या प्रेयसीला वेढतो आहे. डोळ्यांची विशिष्ट हालचाल

करून आपल्या सर्व शक्तिनिशी प्रेयसीला साद घालत आहे. आणि लज्जित प्रेयसीची मूक संमती. हातात हात गुंफलेले. डोळ्यात भाव कोंदलेले. सारंच शब्दातीत. फक्त नेत्रांना उमगतं नि सगळा जीव त्या तरळ हावभावात गुंगून जातो.

## लोक नृत्य

एखादं इंडियन आर्टमधलं कॉम्पोझिशन. रंगाचा तोल साधलेला. रंग निरनिराळे. लाल, पांढरा, काळा; काळा व लाल मिसळून झालेला जांभळा. त्या कॉम्पोझिशनमधले हे सारे रंग नेमकेपणानं विखुरलेले, एकमेकांशी सुसंगत. त्या रंगांच्या सुसंगतीनं नि ताजेपणानं जिवंत, रसरशीत अशी ही रंगाकृती निर्माण केलेली. कल्पना करा, त्याच रंगसंगतीला गती आली आहे, वाद्यांच्या तालात ती पदन्यास करते आहे, हाताचे नाजूक हेलकावे नो अदलाबदल करून निरनिराळी कॉम्पोझिशन्स आकाराला आणते आहे. हे सारं कल्पनेतही किती विलोभनीय! तेच प्रत्यक्षात लोकनृत्य पहाताना जाणवलं.

सरतेशेवटी दिसला तो ब्रह्मी नृत्याचा सर्वोत्कृष्ट आविष्कार! एक लाल पडदा. त्या मागे दोन माणसं बोटांची हालचाल करत असलेली. एक बाहुला हळूच डोकावतो आहे. नक्की न हा बाहुला? का खरोखरीचाच राजपुत्रच? त्या कोणत्याशा देशात लहानशीच प्रजा असते म्हणे, तेथूनच हा कदाचित आला असेल नक्कीच. नाहीतर डोळे एवढे सजीव कसे? आता जो राजपुत्र आणि ती त्याची वधू दोघे नाचताहेत. कोणत्याशा देशातून आलेले हे सजीव देहच नाचताहेत. पण नाहीच. नाचताना मात्र मानवी देह व बाहुलीचा देह ह्यातला फरक जाणवतो. किती झालं तरी मानवी देहाच्या हालचाली जास्त मोकळ्या असणार. नक्कीच ह्या बाहुल्या. मधूनच अंधार. तोच ती दोन माणसं पडद्यामागे बोटांच्या हालचाली करताहेत. पण आता लाल पडदा मोठा आहे. फिरून मोठा बाहुला डोकावतो. अगदी तुमच्या आमच्याएवढा मोठा. आता तो मोठा राजपुत्र आणि त्याची मोठी वधू नाचताहेत. आता मात्र आपण फसत नाही. आकारानं मोठी असली, तरी ती बाहुला बाहुलीच आहेत हे नाचताना जाणवतंच. कारण मानवी अंगविक्षेप आणि बाहुल्यांचे अंगविक्षेप ह्यात फरक आहेच की! प्रयोग संपला. आता ती मोठी बाहुला-बाहुली तुमच्या आमच्यासारखी चालत पुढे येऊन नमस्कार करताहेत. पण हे तर मानवी हावभाव! ही तर खरोखरीचीच माणसं होती की! मग त्यांचे अंगविक्षेप थेट बाहुला-बाहुलींसारखे कसे? असे जर अंगविक्षेप करता येतात तर मग पहिल्यांदा पाहिले ते बाहुला—बाहुलीच की, त्या कोणत्याशा देशातला तो राजपुत्र नी ती त्याची वधू? सजीव कोणते, निर्जीव कोणते? ईश्वरनिर्मित कोणते, मानवनिर्मित कोणते? सचेतन कोणाला ठरवायचं अचेतन कोणाला ठरवायचं? काहीच समजेनासं झालं. सारंच अद्भूत, सारंच अलौकिक.

## दीपक नृत्य

अलंकृत रंगीबेरंगी पोषाखातल्या कमनीय नृत्यांगना हातात दीपक घेऊन नृत्य करतात. ज्योतीचे तेज नि नर्तिकांचे सौंदर्य एकमेकाला शोभा आणणारे, कोमल करकमलतलावर प्रज्वलीत निरांजनं असताना हात लयीत वरखाली होताहेत, अलगद गिरकी घेताहेत; साऱ्या देहांनाच वेग आला आहे. ज्योति आणि त्यांच्या तेजाचे भान राखत चपलगतीने होणारे ते प्रकाशनृत्य म्हणजे लखलखत्या चंदेरी तेजाची, वेगवत्या सौंदर्याची दीपावलीच भासते आहे.

हे असं काय बरं झालं ? हा काळोख कशाने झाला ? कुठे गेल्या त्या लतेसारख्या लवचिक नि ज्योतीसारख्या प्रकाशणाऱ्या लावण्यालतिका ? हो; मान्य केलंच पाहिजे. कार्यक्रम संपला आहे. कधी तरी तो संपणारच होता. दृष्टीसमोरची जादूगारी संपली आहे. पण मनातून तो ब्रह्मी–नृत्याचा पट दूर होतच नाही. नृत्याची ती लय, तो झगझगता दरबार, ती कमनीयता नि ते आरस्पानी सौंदर्य सारं मनःचक्षूंसमोर दिसतंच आहे; अजून दिसतंच आहे.

□ □ □

---

## दूरचे तारे....

पृष्ठ ४४ वरून

प्रतिद्रव्य इंधन म्हणून वापरण्यामागचे जबरदस्त आकर्षण आहे. तज्ञांच्या मते फक्त साडेतीन किंवा थोडे अधिक टन वजनाचे प्रतिद्रव्य अग्नियानाला सहजी दूरच्या ताऱ्यांकडे घेऊन जाऊ शकेल. पण साडेतीन टन वजनाचे प्रतिद्रव्य नेमके असेल तरी केवढे ? उगाच थोडेसे की बरेचसे ?

प्रतिद्रव्याचे मूलभूत कण तज्ञांना पृथ्वीवर केव्हाच गवसले आहेत. पण इतक्या अत्यल्प प्रमाणात की अगदी कंजूष माणसाप्रमाणे त्यांचा कण कण जमा करीत साठा करू म्हटले तरी साडेतीन टनांची मागणी पुरी व्हायला शेकडो वर्षे लागतील. याशिवाय–पण साठ्याचे राहू द्याच. ते मिळवायच्या अगोदरचा यक्षप्रश्न म्हणजे ते साठवायचे तरी कुठे ? आपल्या द्रव्यापासून ते लपवायचे कसे ? कारण द्रव्य आणि प्रतिद्रव्य एकमेकांच्या सान्निध्यात आले की तत्काळ परस्परांचा विनाश घडवून आणणार हे निश्चित !

( क्रमशः )

शिवाय 'काँग्रेस सरकारने आजवर केलेली प्रगती म्हणजे काहीच नाही. आम्ही राज्यकर्ते असतो तरी ही प्रगती आम्हीही केली असती' असे विरोधी पक्षाचे लोक म्हणत असतात व 'सत्ता असल्यावर सर्व काही करता येते. उलट त्या मानाने काँग्रेस सरकारने काहीच केलेले नाही.' असे म्हणून हे कर्तव्यशून्य पक्ष जनतेची दिशाभूल करीत असतात! परंतु त्यांचे हे म्हणणे किती फोल आहे याची प्रचीती १९६७ च्या निवडणुकीच्या अनुषंगाने आली आहेच. त्या निवडणुकीने काही प्रांतात विरोधी पक्षाला राज्यकारभाराची संधी दिली. पण तिचा फायदा यांना काही घेता आला नाही! गेल्या चार वर्षांत यांची मंत्रिमंडळे चाळीस वेळा कोसळलेली आहेत.

या विरोधी पक्षातील बहुसंख्य पक्षांना राष्ट्रीय लौकिक नाही. आणि कम्युनिस्ट पक्ष सोडला तर इतरांची जनमनावर पकडही नाही. आज फक्त काँग्रेस पक्षच (इंदिरा) एक असा पक्ष आहे की त्याचे इमेज भारतभर आहे.

आणि या पक्षालाच लोकसभेसाठी दिल्लीला निवडून दिले पाहिजे असे माझे मत आहे. कम्युनिस्टांनी डोके वर काढणे या देशाच्या प्रकृतीशी जुळणारे नाही; तसेच जातीयवादी पक्ष या देशाचे राजकारण करूच शकणार नाहीत, तेव्हा त्या पक्षाला निवडून देणे म्हणजे आत्मघात ओढवून घेण्यासारखे आहे. संमिश्र मंत्रिमंडळाची काय गत होते याचा अनुभव आपण या चार वर्षांत भरपूर घेतलेला आहे. प्रांतीय राजकारणाची आणि जनतेच्या हिताची संमिश्र मंत्रिमंडळाने होळीच केलेली आहे; आणि या निवडणुकीत जर लोकसभेत संमिश्र मंत्रिमंडळ आले तर या देशाचे हाल कुत्रा खाणार नाही. म्हणून लोकांनी संमिश्र भावनेने मतदान मुळीच करू नये असे माझे स्पष्ट मत आहे. ◻

## दि. बा. मोकाशी

माझा जाहीरनामा आज काही थोड्यांना आवडेल. पण पाचशे-हजार वर्षांनी सारे जग त्याला पाठिंबा देईल. मला तेवढी सवड आहे.

हा जाहीरनामा प्रथमदर्शनी अफाट कल्पनांचा खेळ वाटेल. पण हळूहळू त्यातले मर्म कळू लागेल. त्यासाठी तो पुन्हा पुन्हा वाचावा असे मी सुचवीन.

फार मोठा, फार विस्तृत, अतिशय दूरदर्शी असा दृष्टिकोन ठेवून माणसांचा कारभार करायची वेळ आली आहे. आपण माणसं एकमेकांना शत्रू मानून आज भांडत आहोत. पण आपला खरा शत्रू आहे– परमेश्वर. ज्याला या

सृष्टीचा उत्पत्तीकर्ता मानतात तो. ही सृष्टी त्याने का उत्पन्न केली याचा अजून आपल्याला पत्ता नाही. ते त्याने गुप्त ठेवले आहे.

निवडणुकीच्या जाहीरनाम्यात परमेश्वराचा, 'परमेश्वरा! मी निवडून येऊ दे' या व्यतिरिक्त कुठे संबंध येतो याचं तुम्हाला कोडं पडलं असेल, त्याचा खुलासा करतो. त्यानं उत्पन्न केलेल्या पृथ्वीसंबंधी काही गोष्टी निश्चितपणे आपल्याला कळल्या आहेत. एक–सूर्यमालेतील ग्रहात फक्त पृथ्वीवर मानव आहे. दोन–ही पृथ्वी काही लाख वर्षात थंड पडत जाऊन त्यावरील प्राण्यांचा (मानवासह) नाश होणार आहे.

या अटळ नाशाचा अर्थ असा की भविष्य काळात केव्हातरी माणसाचे आजचे सर्व काही क्षुद्र ठरणार आहे. काही किडे वळवळून गेले या व्यतिरिक्त आपल्या सर्व मारामाऱ्यांचे काही उरणार नाही.

परमेश्वरानं आखलेला अटळ नाश आपण मान्य करायचा का? हा प्रश्न आहे. त्याने दिलेलं आव्हान स्वीकारायचे का? माणसाचा नाश ही रचलेली कथा नाही. अनेक शास्त्रज्ञांनी तो इशारा दिला आहे. त्यांच्याकडे कुणी लक्ष दिले नाही इतकेच.

त्या इशाऱ्याकडे लक्ष जावे व त्या दृष्टीनं आपला व जगाचा कारभार आखण्यास तयार असलेल्यांना निवडून द्यावे यासाठी हा जाहीरनामा आहे.

माणसावरचे भविष्यातले संकट टाळण्यासाठी काय काय करावे लागणार आहे याची कल्पना देतो.

१. सर्व शाखातील ज्ञानाची अपूर्व वाढ करावी लागेल.
२. ग्रहमालेच्या पलीकडे माणसाला योग्य असा ग्रह आहे का याचा शोध घ्यावा लागेल.
३. जरूर पडल्यास पृथ्वीवरील सर्व वस्ती तिकडे हलवण्याची सोय करावी लागेल.
४. माणसांची शक्ती संपूर्ण एकवटावी लागेल.
५. पृथ्वीवरील वाया जाणारी संपत्ती वाचवावी लागेल.
६. त्यासाठी युद्धे थांबवावी लागतील.
७. त्यासाठी देशादेशातील सीमा पुसाव्या लागतील.
८. त्यासाठी वर्णांचे आणि धर्मांचे वेड व संघर्ष आवरावे लागतील.
९. त्यासाठी आपण भारताचे किंवा पाकिस्तानचे किंवा अन्य देशाचे नागरिक आहोत ही भावना टाकून पृथ्वीचे नागरिक आहोत ही भावना बाळगावी लागेल.
१०. त्यासाठी ज्ञानप्रसाराच्या मोठ्या योजना आखाव्या लागतील.
११. पृथ्वीचे आयुष्य वाढावे यासाठीही प्रचंड योजना हाती घ्याव्या लागतील.

१२. माणसामाणसात शांतता व समाधान राहील असे समतोल आर्थिक नियोजन करावे लागेल.

१३. पृथ्वीवर एक भाषा व एक लिपी करावी लागेल.

१४. कलांच्या अविष्कारास पोषक वातावरण निर्माण करायला हवे.

हे झाले की माणसाचे सर्व लक्ष सृष्टीचे कोडे उलगडण्याकडे मोकळे होईल आणि ते कोडे उलगडणे मग अशक्य नाही. पुढचे संकट व सर्वनाश टाळणे अशक्य नाही.

जर हे चित्र प्रत्यक्षात यावयाचे असेल तर देशोदेशीच्या कारभाराला त्या दृष्टीने आजच वळण लागणे आवश्यक आहे. तसा दृष्टिकोन असलेली माणसं निवडून येणं आवश्यक आहे. म्हणूनच आपल्या देशाच्या आजच्या कारभारात त्या दृष्टीनं कोणती धोरणे बदलावी लागतील व कोणत्या चुका सुधाराव्या लागतील हेही जाहीरनाम्यात सांगणे आवश्यक आहे. कारण पृथ्वीवर एक राज्य करण्याची कल्पना स्वप्न नाही. तीही व्यवहार्य आहे. माणसात सुधारणा करीतच ती अमलात येणार आहे.

आपल्या देशानं ठरविलेलं जाती, धर्म, वर्णनिरपेक्ष धोरण हे अतिशय उत्तम आहे. काहीही नुकसानी सोसावी लागली तरी ते खंबीरपणे पालन करणारे निवडले जावेत.

आपल्या देशात लोकसंख्या मर्यादित करण्याचे ठरविलेले धोरण यथायोग्य आहे. ते अमलात आणणारे लोक अधिकारावर हवेत.

आपल्या देशानं समाजवादी लोकशाही स्वीकारली, तिचा पाठपुरावा जोरानं करणारे निवडले गेले पाहिजेत.

अहिंसा व जयजगत या दोन कल्पनांचा प्रचार जगात हिरीरीनं करून रूजवणारी माणसं हवीत. पृथ्वी एक होण्यासाठी त्या तत्त्वांचा उपयोग आहे.

निवडलेल्या उमेदवारात तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, डॉक्टर, कलावन्त, लेखक, कवी, शेतकरी, मजूर, स्त्री-पुरूषांचा भरणा बहुसंख्येनं हवा.

आज जे काही नको असे या जाहीरनाम्याला वाटते त्यात प्रमुख म्हणजे 'आजचे राजकारण.'

एकदा कुठले तरी धरण फुटून वाताहात पाहिल्यावर पंडित नेहरूंनी म्हटले होते की धरणाशिवाय पाणी पुरवठ्याचा कुणी उपाय काढील तर मानवावर त्याचे उपकार होतील.

'राजकारणा'शिवाय राज्यकारभार चालवण्याचा उपाय कुणी काढला तर तोही तसाच उपकारक ठरेल. 'राजकारणांचे, धरण आज फुटले आहे व त्याचीच वाताहात सर्वत्र दिसते आहे. टॉलस्टॉयची एक गोष्ट आहे. एका गावात पैसा ठाऊक नसतो. परस्परांची कामे करून, परस्परांना वस्तू देऊन ते सुखानं जगत असतात. सैतानाला ते पहावत नाही. पाताळातून वर येऊन तो त्या गावात येतो. लोकांना

मोहोरा देऊ लागतो. पण पैशाचा वापर ठाऊक नसल्याने गावातील लोक कुतूहलाने प्रथम त्या मोहोरा घेतात. त्यांच्या गळचात माळा करतात, गाई बैलांना घालतात. पुढे कंटाळून फेकून देतात. तोपर्यंत मोहोरा देऊन सैतानाला ते जेवण देतात. पण नंतर सैतान उपाशी मरू लागतो. काम केल्याशिवाय जेवण नाही अशी त्या गावात पद्धत असते. जेवणाच्या ठिकाणी सैतान चोरून जावयास पहातो. दारावर एक आंधळी मुलगी येणाऱ्यांचे तळहात तपासून आत सोडीत असते. कामामुळे हात राठ आहेत अशांनाच ती आत सोडते. सैतानाचे तळहात अतिशय मऊ असतात. त्याला ती हाकलून देते. तेव्हा भुकेनं व्याकूळ असा तो सैतान वैतागून पाताळात गडप होतो.

आजही ' राजकारणी ' लोकांचे तळहात तपासण्याची वेळ आली आहे. आजच्या बहुतेक पुढाऱ्यांना पाताळात गडप व्हावे लागेल.

' राजकीय पक्ष ' हा एक खेळ झाला आहे. कोणत्याही राजकीय पक्षाच्या पाटीपासूनही मैल मैल दूर राहण्याचा मी यत्न करतो. बहुतेकांचे तेच आहे. आज जगातील पुष्कळ देशात हे चित्र आहे. राजकारणी लोकांचे गोंधळ चालू असून त्या त्या देशातील लोकांचे दैनंदिन जीवन मात्र चालू आहे. हे कौतुक वाटते. राजकारणी लोक बेदिली आणण्याचा मनापासून प्रयत्न करूनही हे देश उभे आहेत. याचे कारण सामान्य माणसांची आपल्या संसारावरील निष्ठा हेच होय. राजकारणी घर पाडतात. तो निष्ठेनं उभे ठेवतो आहे. ' राजकारणा 'च्या शक्तीचा जो गवगवा ' राजकारणी ' करतात तो त्यानं फोल पाडला आहे. आजचे ' राजकारणी ' ज्या पद्धतीनं देश चालवताहेत तसा त्याने संसार चालवला तर समाज राहणार नाही.

सामान्य माणसाच्या सामर्थ्यापुढे ' राजकारण्यां 'ची शक्ती क्षुल्लक आहे हे त्याने सिद्ध केले आहे. ' राजकारण ' किती फालतू व तापदायक आहे हे सामान्य माणसांनी ओळखावे. आजचे ' राजकारणी ' स्वतःची स्वतःच जाहिरात करतात. तशी दुसऱ्या क्षेत्रातील एखाद्याने केली तर असभ्य ठरेल. तेव्हा राजकारणाचा बडेजाव कमी केला पाहिजे. त्यासाठी सावधगिरीनं मतदान केले पाहिजे. माझ्या जाहीरनाम्याला मत द्या हे सांगण्यात अर्थ नाही. माझ्या जाहीरनाम्याला पाठिंबा आज कितपत मिळेल याची उघड शंका आहे. पण मी जाहीरनामा काढला असला तरी मलाही मताचा अधिकार आहे. मला अशा संघटनेला मत द्यावेसे वाटते जी निवडणुकीला उभी नाही. अलिप्त आहे. ही एकमेव संघटना म्हणजे ' सर्वोदय ' संघटना. मला वाटते लोकांनी मनोमन सर्वोदयी संघटनेतील कार्यकर्त्यांना उभे करून त्यांना पेटीत मते टाकावीत. निवडून आणावे व गम्मत करावी.

हे जमले नाही तर त्याच्या खालोखाल इंदिरा गांधींच्या कॉंग्रेसला मते द्यावीत. या बाईंचा पक्ष माझ्या जाहीरनाम्याच्या ध्येयाकडे थोडीशी तरी वाटचाल करीत आहे.

पण सर्वाआधी माझ्या जाहीरनाम्याला मत देता आले तर पहा. पुढचा सर्वंकष विनाश टाळण्याचा दूरदर्शीपणा एकटा त्याच्यातच आहे. अर्थात आज आपले मत त्याला मिळाले नाही तरी पाचशे-हजार वर्षांनी ते मिळणार ही मला खात्री आहे. म्हणूनच मी निवांत आहे.

□

# वि. स. वाळिंबे

निवडणूक-जाहीरनामा म्हटले की स्वत:संबधी गौरवाने बोलणे आले. 'जनते'-संबंधी आपल्याला किती कळकळ वाटते हे सांगणे आले आणि आश्वासनांची खैरात करणेही आले. पण त्या बाबतीत एक गोष्ट चांगली असते. आश्वासने देणाऱ्याला जशी त्या आश्वासनांची आठवण रहात नाही, तसेच मतदारांचेही असते. आश्वासने ही निव्वळ देण्याची वस्तू आहे. पाळण्याची नाही हे गेल्या चार सार्वत्रिक निवडणुकातील अनुभवामुळे मतदारांना मनोमन कळून चुकलेले आहे. आपल्या दाराशी आज याचकासारखा चेहेरा करून उभा असलेला उमेदवार उद्या आपल्याला ओळखही देणार नाही हे मतदारांना पुरपूर ठाऊक असते आणि त्यामुळे उमेदवाराने आपल्या हाती दिलेला जाहीरनामा वाचण्याची तसदी ते घेत नाहीत.

एक छापलेला कागद यापेक्षा निवडणूक-जाहीरनाम्याची मतदारांच्या लेखी अधिक किंमत उरलेली नाही. हे असे का झाले? कारण अगदी स्पष्ट आहे. निवडणुकीच्या रिंगणात उतरणारा प्रत्येक पक्ष आणि त्या पक्षाच्यावतीने उभा राहिलेला उमेदवार आपला उच्चार आणि आचार यात काहीही सुसंगती राखत नाही याबद्दल जाणकार मतदाराची खात्री पटलेली आहे. ज्या लोकसत्ताक राजवटीचा आपण स्वीकार केलेला आहे त्या राजवटीची लोकमानसातील प्रतिष्ठा आणि जिव्हाळा टिकवायचा असेल तर मी जे विचार व्यक्त करीन, त्यानुसार माझे आचरण राहील, असा प्रत्येक उमेदवाराने मतदारांच्या मनात विश्वास निर्माण करायला हवा.

माझ्या निवडणूक जाहीरनाम्यापुरते बोलायचे झाल्यास मी या मुद्याला अग्रस्थान देईन. आपल्या उच्चार-अचारात विसंगती निर्माण झाली तर लोकप्रतिनिधी म्हणून वागण्याचा अधिकार आपण गमावला आहे असे मी अवश्य मानीन. अर्थात् केवळ मी काय मानतो याला फारसे महत्त्व नाही. माझ्या मतदारांना तसे वाटते

की नाही हा खरा प्रश्न आहे. आणि यामुळेच आपण निवडून दिलेला उमेदवार 'परत बोलावण्याचा' (Right to recall) मतदारांना अधिकार द्यायला हवा. वेळ पडली तर मतदार आपल्याला लोकसभेतून वा विधानसभेतून परत बोलावतील असा जर उमेदवाराला धाक वाटला तरच गेल्या तीन वर्षांच्या राजकारणामध्ये आयाराम आणि गयाराम यांचा जो सुळसुळाट झालेला आहे त्याला आळा बसेल.

प्रत्येक पक्ष आणि प्रत्येक उमेदवार आपण जनसामान्यांच्या कल्याणासाठी झटत आहोत, झटणार आहोत असे सांगतो. परंतु अनुभव असा आहे की जनसामान्यांच्या नावाने मते मागणारा उमेदवार निवडून आल्यानंतर आपल्याला एक गठ्ठा मते देणाऱ्या वर्गाचा वा जातीचाच विचार करतो. हे असे का घडते याचे कारणही सोपे आहे. भारतातील कोणताच पक्ष जातिव्यवस्थेचा पुरस्कार करीत नाही. उलट आपण केवळ जातिनिरपेक्षच नव्हे तर धर्मनिरपेक्षही आहोत असे उच्चरवाने सांगतो. परंतु निवडणुकीत तिकिटांचे वाटप करताना येथे कोणत्या जातीचा उमेदवार निवडून येईल याचा हिशोब बांधूनच उमेदवाराची निवड होते. त्यामुळे आपले जातीबांधव हाच काय तो आपला खराखुरा आधार आहे आणि त्याला जपले की आपले काम झाले, इतरांच्या रागालोभाची पर्वा करण्याचे कारण नाही ही खूणगाठ उमेदवाराने आपल्या मनाशी पक्की केलेली असते.

जी गोष्ट जातीयवादाची तीच पैशाची. प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीसाठी किती खर्च करायचा यासंबंधी निवडणूक मंडळाने नियम ठरविले आहेत. परंतु हा नियम फारसा पाळला जात नाही. अपवादाने नियम सिद्ध होतो या सूत्राचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे निवडणूकविषयक खर्चाचा नियम. भारतातील बरेचसे मतदार अज्ञानी आहेत आणि आर्थिकदृष्ट्या दरिद्री आहेत. मतदारांच्या या दुरवस्थेचा गैरफायदा घेण्यासाठी निवडणूक-पूर्व काळामध्ये पैसा पाण्यासारखा वहात असतो. 'माझा निवडणूक जाहीरनामा' या शब्द-संहितेतील 'माझा' या शब्दाचे पावित्र्य मला राखायचे असेल (आणि ते राखलेच पाहिजे) तर जातीय भावनेला आवाहन आणि पैशाचा अश्लाघ्य वापर या दोन्ही प्रचलित प्रथांपासून मला कटाक्षाने दूर राहिले पाहिजे.

हे सारे झाले आचरणासंबंधी. धोरणाचा वा कार्यक्रमाचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.

याबाबतीत एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची जी नव्याने मांडणी झाली त्यामुळे सारी पोथीनिष्ठ तत्त्वज्ञाने आपल्या चौकटीतून निखळून खाली कोसळली आहेत. मानवी जीवनावर सर्वंकष नियंत्रण लादून नव्या समाजव्यवस्थेचा प्रयोग करणाऱ्या रशियाला उत्पादनवाढीसाठी उदारमतवादाचा आश्रय करण्याची गरज भासू लागली तर विमुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार

करणाऱ्या अमेरिकेला अर्थकारणावर शासनाचे मर्यादित नियंत्रण हवे असल्याची जाणीव झाली. त्यामुळे भांडवलशाहीविमुक्त अर्थव्यवस्था, समाजवाद, अर्थसत्तेचे केंद्रीकरण या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये राजकारणी माणसांना आकर्षित करणाऱ्या कल्पनांना प्रत्यक्षात अर्थ उरलेला नाही. तरीदेखील सर्वसामान्य नागरिकांना आकर्षित करण्यासाठी ही कालबाह्य ठरलेली घोषवाक्ये उच्चारण्यातच राजकीय पक्षांना धन्यता वाटते. या दृष्टीने समाजवादाचे उदाहरण सांगण्याजोगे आहे. एक तर समाजवाद नेमका कोठे थांबतो आणि साम्यवाद कोठे सुरू होते हे आजवर कोणीही सुस्पष्ट रीतीने विशद केलेले नाही. दुसरे असे की नवोदित राष्ट्रांपैकी ज्यांनी पोथीनिष्ठ समाजवादाचा अंगिकार केला त्या राष्ट्रांपेक्षा ज्यांनी असे कोणतेही पुस्तकी तत्त्वज्ञान न मानता परिस्थितीनुरूप आपल्या अर्थकारणाची मांडामांड केली त्यांच्या औद्योगिक आणि भौतिक प्रगतीचा वेग अधिक आहे. हे त्या त्या राष्ट्रातील नागरिकांची परिस्थिती पाहून ध्यानात येते.

श्रमजीवी वर्गाच्या वेतनात आणि विविध भत्त्यांमध्ये वाढ व्हावी यासाठी वर्ग लढे आयोजित करणाऱ्या पक्षांची फसगत लक्षणीय आहे. आपल्या आर्थिक सुबत्तेसाठी झगडणारा कामगार या पक्षांच्या अपेक्षेप्रमाणे सामाजिक परिवर्तनाला सामोरा गेला नाही. अधिक वेतन, अधिक सुखसोयी याच चक्रात तो गुरफटला गेला. बरे, त्या प्रमाणात उत्पादनवाढ झालेली नाही. त्यामुळे प्रथम आपण राष्ट्रीय संपत्ती निर्माण केली पाहिजे आणि मग त्या संपत्तीतील आपल्या श्रमशक्तीचा न्याय्य वाटा आपण मागितला पाहिजे, ही जाणीव अभावानेच दिसते. सरकारीकरण झालेल्या उद्योग-व्यवसायातील कर्मचारीवर्ग तर या जाणीवेच्या बाबतीत किती उदासीन आहे याचे पुरावे या उद्योग-व्यवसायांची वार्षिक नफातोटापत्रके वरवर चाळल्यासही पहायला मिळतात. म्हणून उत्पादनवाढीवर म्हणजेच पर्यायाने राष्ट्रीय संपत्तीत भर घालणाऱ्या आर्थिक कार्यक्रमाचा वास्तव परिस्थितीच्या संदर्भामध्ये पुरस्कार करणे हाच माझ्या निवडणूक जाहीरनाम्यातील अग्रक्रमाचा विषय राहील.

भारताचे परराष्ट्रीय धोरण हा आणखी एक सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. हे परराष्ट्रीय धोरण बऱ्याच प्रमाणात राष्ट्राच्या अंतर्गत सामर्थ्यावर अवलंबून असते. जे राष्ट्र आर्थिक आणि लष्करी बाबतीत सामर्थ्यशाली असते, त्याच राष्ट्राचा जगाच्या राजकारणामध्ये प्रभाव पडतो, आवाज ऐकला जातो. केवळ एकतर्फी शांततामय सहजीवनाचा पुकारा करून आपण आपली सुरक्षितता साध्य करू शकत नाही, याचा अनुभव भारतासह अनेक देशांनी घेतलेला आहे. अशा परिस्थितीत लष्करी सामर्थ्याची उपेक्षा करण्यात काहीच स्वारस्य नाही. परंतु त्याबरोबरच हेही खरे आहे की लष्करी सामर्थ्याची उपासना कोणत्या दिशेने

करायची हा प्रश्न संसदेच्या व्यासपीठावर चर्चिला जाण्यात काहीच हशील नाही. त्याचा निर्णय त्या विषयाच्या तज्ज्ञांकडेच सोपविला पाहिजे. उदाहरण द्यायचे तर अणुबाँब भारताने तयार करावा की नाही या प्रश्नाचा उल्लेख करता येईल. रामलीला मैदान, चौपाटी किंवा शनिवारवाडा पटांगण ही या प्रश्नासंबंधी चर्चा वा निर्णय करण्याची ठिकाणे नव्हेत. अणुबाँब तयार करायला किती खर्च येईल, तो पैसा कसा उभा करायचा आणि अणुबाँबची निर्मिती केव्हा आणि कोठे करायची या गहन प्रश्नाचा निर्णय लष्करी अर्थशास्त्रज्ञांनी केला तरच तो निर्णय कृतित होऊ शकेल. त्याचप्रमाणे आपण अणुबाँब निर्माण करण्याची खरोखरच गरज आहे की नाही याचा विचार देशाच्या संरक्षणाची जिम्मेदारी उचलणाऱ्या सेनानींनी केला पाहिजे आणि त्यांचा जो काही विचार ठरेल तो बिनतक्रार मान्य करण्याची तयारी राज्यसत्तेची धुरा सांभाळणाऱ्यांनी दाखविली पाहिजे.

एवढा सारासार विवेक करून आपण आपल्या आर्थिक आणि लष्करी सामर्थ्याची उभारणी केली तर ज्याला आपण खरेखुरे स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण म्हणू शकू अशा धोरणाचा आपल्याला अंगिकार करता येईल. कारण कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण हा त्याच्या सुरक्षिततेचा आणि हितसंबंधांचा आविष्कार असतो. त्यामुळे ज्यायोगे देशाची सुरक्षितता आणि हितसंबंध यांची जपणूक होईल त्याच धोरणाची कार्यवाही व्हायला पाहिजे.

माझ्या निवडणूक जाहीरनाम्याची स्थूल रूपरेषा ही अशी आहे. लोकप्रिय घोषवाक्यांचा त्यात कोठेही शिडकावा झालेला नसल्यामुळे तो मतदारांना कितपत आकृष्ट करू शकेल यासंबंधी मी स्वतःच साशंक आहे. पण हा जाहीरनामा माझा आहे हे समाधान काय कमी आहे.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. H–M 649

# अग्निपुत्र

वसंत पोतदार

प्रकाशनाच्या मार्गावर

तपशील
माणूस : बुधवार
१३ जानेवारी अंकात